सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
फक्त १० मिनिटात रु. ७०,०००/-
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा — दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ११.०२.२०२६ | अंक नं. २६० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
संपर्क : ७७२२ ०१० २२२
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
महाशिवरात्रीच्या उपवासासाठी
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
-: स्टॉकिस्ट :- मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी
दाळ मंडई, अहमदनगर.
फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

# नगरमध्ये दिव्यांगांची तपासणी करणाऱ्या डॉक्टरांचे अचानक ‘काम बंद’ आंदोलन

## सामाजिक संघटनेकडून बदनामी होत असल्याचा आरोप; जिल्हा रुग्णालयात तपासणी आलेल्या दिव्यांगांची गैरसोय



जिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी आलेले दिव्यांग.

नगर – दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेवरून जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी ११ फेब्रुवारी रोजी अचानक कामबंद आंदोलन छेडले. सातत्याने बदनामी केली जात असल्याचा आरोप करत डॉक्टरांनी नियमित दिव्यांग तपासणीवर बहिष्कार टाकला. परिणामी जिल्हाभरातून आलेल्या शेकडो दिव्यांग बांधवांची मोठी गैरसोय झाली.

जिल्हा रुग्णालयात दर बुधवारी दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करून प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया राबविली जाते. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक या दिवशी रुग्णालयात उपस्थित राहतात. शेवटच्या रुग्णापर्यंत तपासणी केली जाते, असा डॉक्टरांचा दावा आहे. अनेकांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी या प्रमाणपत्राची आवश्यकता असते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून तपासणी प्रक्रियेवरून वाद निर्माण झाला असून राज्यभरात या प्रकरणाची चर्चा सुरू आहे. काही सामाजिक संघटनांकडून प्रक्रियेतील त्रुटींचा आरोप करण्यात येत असल्याने वातावरण तापले आहे.

जिल्हा रुग्णालयातील ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. संदीप कोकरे म्हणाले की, एका सामाजिक संघटनेकडून गेल्या वर्षभरापासून सातत्याने डॉक्टरांची बदनामी केली जात आहे. आम्ही प्रामाणिकपणे सेवा देत असताना आमचे मानसिक खच्चीकरण केले जात आहे. आम्हाला अकार्यक्षम ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजात आमची प्रतिमा मलिन केली जात आहे. विनाकारण बदनामी थांबावी, यासाठीच आम्ही आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. गरज पडल्यास सामूहिक राजीनाम्यासही तयार आहोत, असा इशाराही त्यांनी दिला.

तपासणी अचानक बंद झाल्याची माहिती मिळताच जिल्हाभरातून आलेल्या दिव्यांग बांधवांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. काहींनी प्रहार दिव्यांग संघटनेशी संपर्क साधून तक्रार नोंदवली. अनेकांना दिवसभर प्रतिक्षा करूनही तपासणी न झाल्याने निराश होऊन परत जावे लागले. प्रमाणपत्राच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. दूरवरून येण्यासाठी प्रवास खर्च, सोबत मदतनीस यांची व्यवस्था करावी लागते. पुन्हा येणे कठीण आहे, अशी भावना काहींनी व्यक्त केली.

प्रकरणाची दखल घेत प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मणराव पोकळे यांनी रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. डॉक्टरांशी चर्चा करून आलेल्या दिव्यांगांची गैरसोय होऊ नये, अशी विनंती त्यांनी केली. चर्चेनंतर शंभर टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींची तपासणी सुरू करण्यात आली. मात्र इतर दिव्यांगांची तपासणी न झाल्याने अनेकांना पुन्हा येण्याची वेळ आल्याने असंतोष कायम आहे.

दरम्यान, या प्रकरणी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सकांशी चर्चा करून तोडगा काढण्यात येणार असल्याचे ॲड. पोकळे यांनी सांगितले. तपासणी प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

# नगरमध्ये १२ ठिकाणी पे ॲण्ड पार्क तर १२ ठिकाणी नो पार्किंग, नो हॉकर्स झोन

## प्रस्तावाबाबत अहिल्यानगर महापालिकेने मागविल्या नागरिकांकडून हरकती व सूचना

नगर – अहिल्यानगर महापालिका हद्दीतील / क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुरळीत / नियंत्रित करण्याच्या दृष्टिकोनातून महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार १२ ठिकाणी पे ॲण्ड पार्क तर १२ ठिकाणी नो पार्किंग, नो हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहेत. याबाबत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

प्रस्तावित पे ॲण्ड पार्क करावयाचे रस्ते पुढील प्रमाणे – १. अहिंसा चौक ते आनंदधाम चौक (चारचाकी, दुचाकी), २. अहिंसा चौक ते चाणक्य चौक (चारचाकी, दुचाकी), ३. प्रेमदान चौक ते एस्सार पंप (चारचाकी, दुचाकी), ४. पारिजात चौक ते सुरभी हॉस्पिटल (चारचाकी, दुचाकी), ५. कुष्ठधाम चौक ते कलानगर चौक (गुलमोहर रोड) (चारचाकी, दुचाकी), कापड बाजार – मदुरा क्लोथ ते हनुमान मंदिर, सर्जेपुरा (चारचाकी, दुचाकी), ७. सर्जेपुरा हनुमान मंदिर ते अप्पू हत्ती चौक (चारचाकी, दुचाकी), ८. घास गल्ली (फक्त मध्यभागी दुचाकी), ९. गुणे आयुर्वेद कॉलेज ते स्वस्तिक चौक, १०. मंगल गेट ते रामचंद्र खुंट, ११. पारशा खुंट ते कोठी चौक, १२. साईदिप हॉस्पीटल लगतचा रस्ता

प्रस्तावित नो पार्किंग नो हॉकर्स झोन – १. आनंदधाम चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, २. अहिंसा चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ३. चाणक्य चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ४. महात्मा फुले चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ५. पाटील हॉस्पिटल चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ६. एस्सार पंप, बालिकाश्रम चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ७. सुरभी हॉस्पिटल चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ८. पारिजात चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ९. गुलमोहर पोलीस चौकीच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, १०. आयुर्वेद कॉलेज चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, ११. अमरधाम चौकाच्या २५ मी. आजूबाजूचा परिसर, १२. मोची गल्ली रोड

महापालिकेने शहरातील वातहूक कोंडी टाळण्यासाठी वरील रस्ते पे ॲण्ड पार्क व नो–पार्कींग, नो–हॉकर्स झोन करण्याचे प्रस्तावित केले असून याबाबत नागरिकांचे काही हरकती, सुचना, आक्षेप असल्यास ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दुपारी १२ वाजेपर्यंत प्रभाग समिती कार्यालय क्र. १ सावेडी, प्रभाग समिती क्र. २ (जुने महानगरपालिका कार्यालय,) माळीवाडा, प्रभाग समिती कार्यालय क्र. ३, झेंडीगेट, प्रभाग समिती क्र. ४ कार्यालय, बुरूडगाव रोड, मुख्य प्रशासकीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर या ठिकाणी मुदतीत लेखी स्वरूपात कळवाव्यात असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
मुलींचे १ ते १६ वर्षांपर्यंत पार्टी वेअर भारी क्वॉलिटीचे ड्रेस
रु. ३००० किंमतीचे फक्त ₹600/-
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
लग्न समारंभ, सनासुदीसाठी मुलांचे लिनन फॅब्रिकमध्ये भारी क्वॉलिटीचे पार्टी वेअर ड्रेस
१ ते ८ वर्षां पर्यंतच्या मुलांचे बाबासुट — रु. १५०० किंमतीचे फक्त ₹500/-
१ ते १६ वर्षां पर्यंतच्या मुलांचे कुर्ता-पायजमा — रु. २००० किंमतीचे फक्त ₹500/-
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल — पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

JOIN ONLY IN 4500/-
DiSHA Computer Institute — Expert in Computer Training
MS-OFFICE, TALLY PRIME, ADV. EXCEL — 3 Month
CORELDRAW, PHOTOSHOP, CANVA — 3 Month
CAD 2D, CAD 3D, PHOTOSHOP — 3 Month
C LANG, C++, HTML — 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महापालिकेच्या स्थायी समिती व महिला बालकल्याण समितीमध्ये राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार सदस्यांची निवड केली जाणार

## दोन्ही समित्यांमध्ये प्रत्येकी १६ सदस्य नियुक्त केले जाणार

नगर - महापौर व उपमहापौर निवडणुकीनंतर स्वीकृत सदस्य, तसेच स्थायी समिती व महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांच्या निवडी विशेष सभेत केल्या जाणार आहेत. दोन्ही समित्यांमध्ये प्रत्येकी १६ सदस्य नियुक्त केले जाणार आहेत. महानगरपालिकेच्या विशेष सभेत संबंधित पक्षांच्या गटनेत्यांकडून सदस्यांच्या नावांची शिफारस करण्यात येणार आहे. एकूण सदस्य संख्या व समितीची सदस्य संख्या या आधारावर ४.२५ एवढे मूल्यांकन असणार आहे. त्यानुसार राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे २७, भारतीय जनता पक्षाचे २५, शिवसेनेचे १०, काँग्रेसचे २, एमआयएमचे २, बसपा १ व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १ असे संख्याबळ आहे. या संख्याबळाच्या आधारावर स्थायी समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ६, भारतीय जनता पक्षाचे ६, शिवसेनेचे २, तसेच काँग्रेस व एमआयएमचा प्रत्येकी १ सदस्य नियुक्त होणार आहे. महिला व बालकल्याण समितीमध्येही असेच संख्याबळ असेल.

महानगरपालिकेच्या सदस्य निवडीच्या विशेष सभेत संबंधित पक्षाच्या गटनेत्यांकडून सदस्यांच्या नावांची शिफारस केली जाईल व त्यानुसार नियुक्त्या केल्या जातील.

स्थायी समिती व महिला बालकल्याण समिती सदस्यांच्या निवडी झाल्यानंतर स्थायी समिती सभापती व महिला बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापती निवडीसाठी निवडणुकीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात येईल. विभागीय आयुक्तांकडून निवडणुकीसाठी सभेची तारीख जाहीर झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन निवडणूक पार पडणार असल्याचेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

## बोल्हेगाव येथे गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नगर - बोल्हेगाव येथील गणेश चौकात तरुणाचे राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी रात्री १०.२२ वा.च्या सुमारास उघडकीस आली. दादासाहेब भाऊसाहेब बोरुडे (वय ३८, रा. गणेश चौक, बोल्हेगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. दादासाहेब बोरुडे यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यास उपचारासाठी रुग्णवाहिकेतून तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून तोफखाना पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## दयाबाई पाखरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नागरदेवळे येथील रहिवासी श्रीमती दयाबाई सिंधू पाखरे (वय ८०) यांचे ११ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष पाखरे यांच्या त्या मातोश्री होत.

## किशोर बेल्हेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सुडके मळा बालिकाश्रम रोड येथील रहिवासी किशोर रामभाऊ बेल्हेकर (वय ६१) यांचे ११ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कुसुमबाई कोठारी (ओस्तवाल) यांचे निधन



नगर - श्रीमती कुसुमबाई ताराचंद कोठारी (ओस्तवाल, वय ७९) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी, चार नातवंडे असा परिवार होता.

अर्बन बँकेचे मॅनेजर ताराचंद ओस्तवाल यांच्या त्या पत्नी, विजय आणि दिनेश ओस्तवाल यांच्या आई होत. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.

## राजेंद्र काळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भिस्तबाग चौक येथील धनसंपदा अपार्टमेंट येथील रहिवासी राजेंद्र नारायण काळे (वय ६५) यांचे १० फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ भाऊ, ३ बहीणी असा परिवार आहे. राजश्री राजेश्वरी काळे यांचे ते पती तर मधुसूदन काळे यांचे वडील होत.

## पोपटराव भालसिंग यांचे अल्प आजाराने निधन



नगर - वाळकी येथील रहिवासी पोपटराव त्रिंबक भालसिंग (वय ७०) यांचे ११ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सरस्वती एजन्सीचे संचालक अजित भालसिंग यांचे ते वडील होत.

## रामचंद्र धर्माधिकारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बँक ऑफ महाराष्ट्राचे निवृत्त अधिकारी रामचंद्र वासुदेव धर्माधिकारी (वय ९०) यांचे ९ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सेवाकालात प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यनिष्ठा यासाठी ओळखले जाणारे श्री. धर्माधिकारी निवृत्तीनंतरही सक्रिय जीवन जगत होते. मराठी साहित्याविषयी त्यांना विशेष आस्था होती. विविध साहित्यिक उपक्रम, वाचन, लेखन तसेच सामाजिक कार्यात त्यांनी जिव्हाळ्याने सहभाग घेतला. त्यांच्या सहवासातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

## पारुबाई औटी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बोल्हेगाव गांधीनगर येथील चोभे रो.हौ. येथील रहिवासी पारुबाई अर्जुन औटी (वय ८५) यांचे १० फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगी, जावई असा परिवार आहे.

## कौशल्या हरदास यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - श्रीदत्त मंदिर रोड, मोरगेवस्ती, वॉर्ड नं.७ येथील रहिवासी कौशल्या पुंजा हरदास (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शांतीनाथ, बाळासाहेब, तात्या हरदास व आशाबाई सोपान साळुंके यांच्या मातोश्री, योगेश, जनार्दन, शुभम व ऋषिकेश हरदास यांच्या आजी होत.

## इंग्रजीच्या पहिल्या पेपरला कॉपी करताना ९ जणांना पकडले

नगर - जिल्ह्यात यंदा बारावीच्या परीक्षेत कॉपीमुक्तसाठी प्रशासनाने मोठी तयारी केली. मात्र, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील दहावी- बारावीच्या परीक्षेतील कॉपीची परंपरा या वर्षीही कायम असल्याचे दिसून आले आहे. जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने बारावीच्या पहिल्याच इंग्रजीच्या पेपरला ४५ पथके तयार करून त्याव्दारे परीक्षा केंद्रांना भेटी परीक्षेवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही पाथर्डी तालुक्यात ७ तर शेवगाव तालुक्यातील २ अशा कॉपी केसेस समोर आल्या आहेत.

दरम्यान, बारावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यात व नगर शहरासह तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण भागात एकूण ११६ परीक्षा केंद्र होती. या ठिकाणी ६२ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात परीक्षेला ६१ हजार ३१९ विद्यार्थी हजर होते. १ हजार १४३ विद्यार्थी गैरहजर होते. यंदापासून जिल्ह्यात पहिल्यांदा बारावीच्या संवेशनशील ३८ केंद्रांसह कॉपी होणाऱ्या केंद्रांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बैठे पथक तैनात होते. तसेच सात भरारी पथक देखील परीक्षेच्या काळात वेगवेगळ्या केंद्रांना भेट फिरतांना दिसत होते. दहावी आणि बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी रोखण्यासाठी जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांना संरक्षण भिंती, तसेच परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले.

याशिवाय केंद्रावरील प्रत्येक पर्यवेक्षकांचा मोबाईल झूम ॲपच्या माध्यमातून जिल्ह्याच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात आले होते. त्या ठिकाणाहून पहिल्या टप्प्यात काल ३८ संवेदनशील केंद्रांचे थेट चित्रिकरण करण्यात आले.

# पोलीस कारवाईस जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याने अधीक्षक कार्यालयासमोर १६ फेब्रुवारीपासून उपोषण

नगर - अहिल्यानगर शहर, पारनेर व अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी व गुन्ह्यांवर जाणीवपूर्वक कारवाई केली जात नसल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. वारंवार लेखी पत्रव्यवहार करूनही संबंधित पोलीस ठाण्यांकडून ठोस कारवाई होत नसल्याने शासन नियमांची पायमल्ली होत असल्याचा आरोप समितीने केला आहे.

या सर्व प्रकरणांबाबत तातडीने कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे करण्यात आली आहे. मात्र, अद्यापही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने समितीने १६ फेब्रुवारी पासून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

समितीच्या वतीने मांडण्यात आलेल्या प्रमुख तक्रारीप्रमाणे; पारनेर पोलीस स्टेशनमध्ये दाखल एफ.आय.आर. ३ फेब्रुवारी २०२६ नुसार सी.सी. टी.व्ही. फुटेज उपलब्ध असतानाही आरोपीस अटक करण्यात दिरंगाई होत असून तपास जाणीवपूर्वक लांबविला जात आहे. तसेच एफ.आय.आर. २६ जानेवारी २०२६ नुसार गुन्ह्यात वापरलेले डंपर वाहन जप्त करून तहसील कार्यालय, पारनेर यांच्याकडे हस्तांतरित करण्यातही विलंब केला जात आहे.

याशिवाय एफ.आय.आर. ४ जानेवारी २०२६ अंतर्गत जप्त करण्यात आलेले वाहन आजतागायत तहसील कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आलेले नाही. अहिल्यानगर शहरातील कोतवाली पोलीस स्टेशनच्या आशिर्वादाने माळीवाडा व रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असलेले बिंगो, तिनपत्ते व टायगर क्लब यांसारखे जुगार अड्डे बंद करण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही कारवाई झालेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

तसेच अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशन भिंगार अंतर्गत रुईछत्तीसी व वाटेफळ हद्दीत हायवेवर सुरू असलेला वेश्या व्यवसाय कायमस्वरूपी बंद करण्याबाबत पत्रव्यवहार करूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये दाखल एफ.आय.आर. १८ जुलै २०२५ रोजीच्या हल्ला प्रकरणातील आरोपींना आजअखेर अटक करण्यात आलेली नाही.

याचबरोबर नगर-जामखेड रोडवरील कोल्हेवाडी फाटा येथे खुलेआम सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे विषारी दारू पिऊन एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडूनही संबंधित आरोपीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप समितीने केला आहे. वरील सर्व तक्रारींबाबत वारंवार निवेदने देऊनही पारनेर पोलीस स्टेशन, अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशन व कोतवाली पोलीस स्टेशनकडून जाणीवपूर्वक कारवाईस टाळाटाळ केली जात असून आरोपींना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे १६ फेब्रुवारी पासून अनेक सामाजिक संघटनांसह पीडित नागरिकांना घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## १४ फेब्रुवारी रोजी रोज डे ऐवजी रोटी डे साजरा करणार

भिंगार - आपल्या घासातला घास गरजवंतास देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. भिंगार येथील माणुसकी मित्र मंडळ आणि शिवचंद्र सामाजिक युवा प्रतिष्ठान ह्यांच्यावतीने सलग सातव्या वर्षी १४ फेब्रुवारी रोजी रोज डे ऐवजी रोटी डे साजरा करणार आहोत. भिंगारवासियांना नम्र विनंती आहे की १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत मोहोटादेवी मंदिरासमोर, एम.जी. रोड, भिंगार येथे पाच चपात्या आणि सुकी भाजी मंडळाच्या सदस्यांकडे आणून द्यावी. सकाळी ११ वाजेनंतर विविध ठिकाणच्या गरजूंना जमा झालेल्या चपात्या आणि भाजी पोहोच करणार आहोत. संपर्कासाठी संतोष गायकवाड मो. ९५११८२५१४४, सौरभ धाडगे मो.९२७३८००२७७, सुनील राऊत मो. ९८२२७५८३८३, कैलास उबाळे मो.८४५९०८५८७८, नवनाथ डोकडे मो.७३५०४९५४७१.

## राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धेमध्ये ज्ञानसंपदा शाळेचे नेत्रदीपक यश



नगर - कोपरगाव (जि. अहिल्यानगर) येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये ज्ञानसंपदा शाळेतील एकूण सात विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ज्ञानसंपदा शाळेतील शिवदीप मोरे या विद्यार्थ्याने ९.५७ मीटर गोळा फेकून राज्यात चौथा क्रमांक पटकावला. अगदी कमी वयामध्ये सातत्यपूर्ण सराव व चिकाटी यामुळे हे घवघवीत यश संपादन केल्यामुळे शिवदीप याचे अहिल्यानगर जिल्ह्यातून तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर, संस्थेचे विश्वस्त यांच्याकडून कौतुक करण्यात आले. त्याच्या या यशामागे क्रीडा शिक्षक गोरक्ष धात्रक, मच्छिंद्र साळुंके, विकास परदेशी यांचे योगदान लाभले.

# नगर शहराच्या भरवस्तीत चोरट्यांचा धुमाकूळ; एका घरात चोरी तर अनेक ठिकाणी चोरीचा प्रयत्न

नगर - शहरातील नवी पेठ परिसरात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत एकाच रात्रीत एका घराचा कडी कोयंडा तोडून चोरी केली तर शेजारील दुकान व इतर ४-५ ठिकाणी दरवाजाचे कडी कोयंडे तोडून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. १० फेब्रुवारीला पहाटे या घटना घडल्या. भर वस्तीत एकाच रात्रीत अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील नवी पेठ भागातील रतन भवन परिसरातील रहिवासी आणि कॉलेज कॅन्टीन चालक कृष्णगोपाळ सत्यनारायण चौहाण हे कुटुंबासह ७ फेब्रुवारी रोजी नातेवाईकांकडे गेले होते. १० फेब्रुवारी रोजी सकाळी त्यांच्या शेजाऱ्यांनी घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहिले. त्यांनी लगेच चौहाण यांना फोन करून माहिती दिली. ही माहिती मिळताच चौहाण तातडीने नगरमध्ये आले. त्यांनी घरी येऊन पाहिले असता, चोरट्यांनी दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करत घरातील पितळी भांडी, तांब्याचे ताट, लोटे, गॅस टाक्या आणि चांदीचे पैंजण असा एकूण २० हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

केवळ चौहाण यांच्याच घरी नव्हे, तर चोरट्यांनी परिसरातील आनंद प्रकाश गुंदेचा यांचे दुकान फोडले असून संतोष प्रकाश काकडे, योगीता सतीश पुरोहित आणि राजेंद्र गंगाधर भुमकर यांच्या घराचे कडी-कोयंडे तोडून चोरीचा प्रयत्न केला आहे. एकाच रात्री अनेक ठिकाणी झालेल्या या चोरीच्या सत्रामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत कृष्णगोपाळ चौहाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (४), ३०५ (अ), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



शहरातील जुन्या महापालिकेजवळ असलेल्या बेग पटांगणात पसरलेले घाणीचे साम्राज्य.

# जुन्या महानगरपालिकेजवळील बेग पटांगणात घाणीचे साम्राज्य

## त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा शिवसेनेचा इशारा

नगर - शहरातील जुन्या महापालिकेजवळ प्रभाग क्र. १२ मधील बेग पटांगण येथे प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले हे घाणीचे साम्राज्य त्वरित साफ करण्यात यावे अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यात म्हंटले आहे की प्रभाग क्र. १२ मधील मनपाच्या ताब्यातील असलेले बेग पटांगण यामध्ये मनपाचे कंटेनर व इतर भंगार साहित्य, मैदानात साचलेला कचरा व झालेली अतिक्रमणे त्वरित काढून टाकण्यात यावीत, संबंधीत ठिकाणी स्वच्छतेनंतर या भागातील नागरिकांच्या सोईसाठी या जागेवर सुशोभिकरण करुन जॉगिंग पार्क करण्यात यावा.

बेग पटांगण ही जागा मनपाच्या मालकीची असून मोकळ्या जागेवर पुरातत्व विभागाच्या अडचणीमुळे बांधकाम करणे शक्य नाही, त्यामुळे जागेला सुरक्षा भिंत व मोकळ्या जागेत जॉगिंग पार्क सारखा उपक्रम करण्यात कोणतीही कायदेशीर अडचण राहणार नाही. या ठिकाणी वृक्षारोपण व अन्य सोई सुविधा करण्यात याव्यात.अशी मागणी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी केली आहे.

या निवेदनावर प्रभाग १२ मधील नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, दत्तात्रय कावरे, मंगलाताई लोखंडे आदींच्या सह्या आहेत

वरील मागणीची दखल घेवून त्वरित कार्यवाही करावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

# धनादेश न वटल्याच्या प्रकरणातील जामीनदारास कारावासाची शिक्षा

नगर - येथील १० वे अतिरक्त चिफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट ए जी एम शेख यांनी जामीनदार असलेले आरोपी अफलातुन फोटो चे प्रोपा. संजोग पांडुरंग आडोळे (रा. सावेडी, अ.नगर) यांस निगोशिएबल इन्स्ट्रुमेट ॲक्ट कलम १३८ मध्ये दोषी ठरवून दोन महिन्यांचा साधा कारावास व नुकसान भरपाई रक्कम रु. २,३६,००० ही फिर्यादी सी टी चिटस कंपनी यांना देण्याचा आदेश दिला आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम एक महिन्यात न भरल्यास अतिरिक्त एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

सी.टी. चिट्स प्रा. लि. शाखा अ.नगर येथुन मच्छिंद्रनाथ गायकवाड यांनी चिट्ची भिशीची रक्कम रु. ५,००,००० घेतलेली होती व तसेच सदर भिशीचा हप्ता नियमितपणे भरणा करणार असा विश्वास दिला होता. परंतू त्यांनी भिशीच्या हप्ता रक्कम थकवली होती. सदर चिटस भिशी मध्ये अफलातुन फोटो चे प्रोपा. संजोग पांडुरंग आडोळे हे भिशी घेणार मच्छिंद्रनाथ गायकवाड यांना जामीनदार होते. भिशी घेणार मच्छिंद्रनाथ गायकवाड यांच्या थकीत रक्कमेपोटी जामीनदार अफलातुन फोटो चे प्रोपा. संजोग पांडुरंग आडोळे यांनी स्वतःचे खाते असलेल्या युनियन बँक शाखा सावेडी चा रक्कम रुपये रु. १,१८,७५० चा चेक फिर्यादी सी.टी. चिट्स प्रा.लि. यांना दिला होता. त्यानंतर फिर्यादी कंपनीने सदरचा चेक हा त्यांचे खाते असलेल्या ॲक्सिस बँक शाखा सावेडी येथे चेक हा वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्याने चेक न वटता परत आला होता. त्यामुळे फिर्यादी संस्थेने अफलातुन फोटो चे प्रोपा. संजोग पांडुरंग आडोळे रा. सावेडी यांचे विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेच्या वतीने माहितगार इसम म्हणुन अशोक तांबे यांनी काम पाहिले तसेच कंपनीचे मॅनेजर विरेद्रसिंग गैर यांनी सहकार्य केले.

सदर प्रकरणामध्ये कागदोपत्री दाखल केलेला पुरावा आणि फिर्यादी संस्थेतर्फे ॲड. प्रविण मुटकुळे यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन मच्छिंद्रनाथ गायकवाड यांचे जामीनदार अफलातुन फोटो चे प्रोपा. संजोग पांडुरंग आडोळे यांना दोषी ठरवण्यात आले आहे. फिर्यादी संस्थेतर्फे एकुण ३ साक्षीदार तपासण्यात आले. या निर्णयामुळे आर्थिक संस्थांना संरक्षण मिळेल. तसेच चेक अनादर प्रकरणी कायदयाचा धाक अधिक बळकट होवुन अशा प्रकारच्या फसवणुकीस आळा बसण्यास मदतच होईल. असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## बुऱ्हाणनगर येथून दोन अल्पवयीन मुलांसह महिला बेपत्ता



नगर- नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर परिसरातून एक महिला व तिची दोन अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सौ. छाया विष्णु चुंभळकर (वय ३०) ह्या ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता दोन मुलांसह निघून गेल्या आहेत. त्यांच्यासोबत श्रावणी विष्णु चुंभळकर (वय १०) व गणेश विष्णु चुंभळकर (वय ३) ही दोन मुले आहेत. याबाबत संतोष बापु पुकाळे (वय ३६, रा. बाणेश्वर कॉलनी, बुऱ्हाणनगर) यांनी खबर दिली असून, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.२३ वाजता अपहरण/मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. याचा तपास पो.हे.कॉ. मोहन भेटे यांच्या मार्फत सुरू असून सदर महिला व मुलांचा शोध घेण्याचे काम पोलीस प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू आहे. सदर व्यक्तींबाबत कोणास माहिती मिळाल्यास जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### मुलांना या गोष्टी शिकवा...

मुलांना सांभाळणे खूप कठीण झाले आहे. मोबाईल फोन आणि त्यांच्या सभोवतालच्या वातावरणामुळे बहुतेक मुले फक्त वाईट गोष्टी शिकतात आणि त्यांच्या करिअरकडे लक्ष न देता संपूर्ण दिवस त्यांचा वेळ घालवतात. प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे की त्यांनी सकाळी उठताच त्यांच्या मुलांना काही गोष्टी शिकवाव्यात आणि त्यांना त्यांचे अनुसरण करण्यास सांगावे जेणेकरून ते अभ्यासात चांगले होतील. सकाळची वेळ मेंदूसाठी खूप चांगली मानली जाते. त्यामुळे मुलांना जे काही शिकवले जाते ते आठवते. म्हणून, सकाळी लवकर उठा, मुलांना फिरायला घेऊन जा आणि त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करा. तुमच्या मुलाला सकाळी उठताच देवाप्रती कृतज्ञता व्यक्त करायला शिकवा. यामुळे त्यांना हे समजेल की देव हाच देणारा आहे आणि तोच हे जग चालवतो. याव्यतिरिक्त, तुमच्या मुलाला मदत करणाऱ्या प्रत्येकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास प्रोत्साहित करा. जसे की अंथरुण सजवणे, दात घासणे, कपडे घालणे आणि नाश्त्याची प्लेट स्वयंपाकघरात सोडणे. हे तुमच्या मुलाला स्वावलंबी बनवण्यास शिकवेल.

## पाककला

### सोया मसाला टिक्की

**साहित्य :** सोया चंक्स एक कप, तेल, आले लसूण पेस्ट, जिरे एक टीस्पून, टोमॅटो प्युरी एक कप, सिमला मिरची एक कप, कांदा बारीक चिरलेला, हळद एक टीस्पून, लाल तिखट एक टीस्पून, धणेपूड एक टीस्पून, गरम मसाला एक टीस्पून, भाजलेले बेसन तीन चमचे, चवीनुसार मीठ, अर्धा वाटी दही, लिंबाचा रस

**कृती :** सोयाचे तुकडे पाण्यात टाका आणि चांगले उकळवा. नंतर ते चांगले शिजल्यावर सर्व सोयाबीनचे तुकडे पिळून घ्या आणि पाणी काढून टाका. आता यानंतर एका भांड्यात दही घ्या. नंतर त्यात भाजलेले बेसन, मीठ, तिखट आणि धणे पावडर घाला. तसेच गरम मसाला घालून मिक्स करावे. यानंतर सोयाबीनचे तुकडे घाला आणि मिक्स करा. आता ते अर्धा तास मॅरीनेट करण्यासाठी सोडा. नंतर पॅनमध्ये तेल गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात जिरे घाला. तसेच बारीक चिरलेला कांदा, आले लसूण पेस्ट घालून परतून घ्या. कांदा परतवल्यानंतर त्याच्यात टोमॅटो घाला आणि तेल सुटेपर्यंत शिजवा. नंतर त्यात लाल मिरची, धणेपूड, गरम मसाला घालून मिक्स करावे. आता मॅरीनेट केलेले सोयाबीनचे तुकडे घालावे आणि चांगले मिसळा. यानंतर, आवश्यकतेनुसार गरम पाणी घालून थोडी ग्रेव्ही बनवा आणि शिजवा. वरून हिरवी कोथिंबीर गार्निश करावी.

## वास्तू

### याने होतील वास्तूदोष दूर

जर तुमच्या घरात एखादा सदस्य अचानकच आजारी पडतो आणि कुठलेही औषध त्याच्यावर लागू पडत नसेल तर एका लिंबावर काळ्या शाहीने ३०७ लिहून त्या व्यक्तीवर विपरीत दिशेने सातवेळा फिरवा आणि झाडावर टाकून द्या. असे केल्याने त्याच्या आरोग्यात सुधारणा होईल.

## सौंदर्य

केस रोज धुतल्यास नैसर्गिक तेल कमी होऊन केस रुक्ष होऊ शकतात. मात्र त्यामुळे केस पांढरे होत नाहीत.

## सल्ला

रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्याला केशर भिजवलेले पाणी किंवा केशर-हळद मिश्रित दुध लावल्याने त्वचेला नैसर्गिक चमक येते

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, ज्येष्ठा १३|४२, सूर्योदय ०६ वा. ४० मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे.

**मिथुन** : हातावर हात ठेवल्याने कोणतेही कार्य होत नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका. आपल्या उतावीळ स्वभावाला आज नियंत्रीत करावे.

**कर्क** : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरुवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा. पत्नीकडून उत्तम वैवाहिक सुख प्राप्ती होईल.

**सिंह** : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. मुले व पत्नीचा सहवास लाभेल. दिवस चांगला जाईल.

**कन्या** : कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. दिवस आनंदात जाईल. आपला चंचल स्वभाव मात्र स्थिर ठेवावा.

**तूळ** : भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैसे देण्याच्या बाबतीत जपून वागावे लागेल.

**वृश्चिक** : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. आज कुणालाही आर्थिक मदत करू नका. वाहने व यांत्रिक उपकरणे सावधगिरीने हाताळावीत.

**धनु** : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. पैसे बुडण्याची शक्यता अथवा फसवणूक होऊ शकेल.

**मकर** : सामान्य स्थितीत मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. महत्त्वाची कामे आज करू नयेत. सार्वजनिक ठिकाणी मानसन्मान मिळेल.

**कुंभ** : प्रेम व रोमांसच्या प्रकरणांमध्ये यश मिळेल. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मीन** : कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. जुनी मित्र-मैत्रिणी भेटतील. आपला प्रामाणिक स्वभाव असल्यामुळे कामे पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७३६५ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३६४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भारतातील एक घटक राज्य ५) लहान अपुरे धोतर ७) सुखदुःख जाणणारे अदृश्य इंद्रिय ८) येणेजाणे; वर्दळ १०) पंजाबमधील एक नदी १२) एक प्राणी; शेळी १४) हवा; वारा १५) लेकरू; वासरू; पिल्लू १६) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट १८) घोड्याला दाणा चारण्याची पिशवी २०) आशय; हेतू; स्वार्थ २२) राखण; राख; राखी २४) नेहमी; हमेशा २५) लेचापेचा; हडकुळा; अशक्त २६) महिना; माह; माहे

**उभे शब्द :-** १) तापट; रागीट २) हांजी हांजी; खुशमत; आर्जव ३) दुःखी; खिन्न ; नाखुष ४) बूड; बुडी; तोटा ६) नोकरी; दास्य; सेवा ९) लागलीच; तातडीने ११) वाईट सवय; खोड १३) हातोटी; कौशल्य १६) मुस्लिम वर्षाचा पहिला महिना १७) नाते; गोत्रजांचा 'समुदाय १९) 'दासबोध, मनाचे श्लोक' रचणारे मराठी संत २१) तगादा; भुणभुण (मागणीचा) २३) खारट पदार्थ; मीठ; लवण २४) पूर्ण भरतीची वेळ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जुना इतिहास घोकण्यापेक्षा नवा इतिहास निर्माण करणे गरजेचे आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मायक्रोवेव्हमध्ये कोणते पदार्थ गरम करू नये?

आजच्या काळात आपल्या जीवनशैलीत खूप बदल झाले आहेत. आजकाल घरात किंवा ऑफिसमध्ये अन्न शिजवण्यासाठी किंवा गरम करण्यासाठी मायक्रोवेव्ह असतात. मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करणे खूप सोपे आहे. तुमचा ग्लास किंवा प्लास्टिक टिफिन मायक्रोवेव्हमध्ये ठेवून तुम्ही अन्न सहज गरम करू शकता. पण तुम्हाला माहिती आहे का की मायक्रोवेव्हमध्ये काही गोष्टी गरम करणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. वास्तविक, मायक्रोवेव्हमध्ये या गोष्टी पुन्हा गरम केल्याने अन्न बदलते, ज्यामुळे तुम्हाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. जाणून घेऊया या पदार्थांबद्दल...

भात : भात मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. भात पुन्हा गरम केल्याने अन्नातून विषबाधा होऊ शकते. वास्तविक, भातामध्ये बॅसिलस सिरियस नावाचा जीवाणू असतो. तांदूळ पुन्हा गरम केल्याने त्याचे प्रमाण वाढते. उष्णतेमुळे जीवाणू नष्ट होतात परंतु त्यामुळे बीजाणू निर्माण होतात जे विषासारखे असतात. बॅक्टेरियामुळे तुम्हाला जुलाब, उलट्या किंवा पोटदुखी सारख्या समस्या होऊ शकतात.

उकडलेले अंडे: उकडलेले अंडे कधीही म यक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. मायक्रोवेव्हमध्ये अंडे गरम केल्याने ते प्रेशर कुकरसारखे गरम होते, ज्यामुळे अंड्याचा स्फोट होऊ शकतो. मायक्रोवेव्हमध्ये अंड्याचा स्फोट होत नसल्यास, ते तुमच्या प्लेट किंवा हातावर स्फोट होऊ शकते. त्यामुळे मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नका.

पालेभाज्या: तुम्ही पालक किंवा ब्रोकोली सारख्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नयेत. एका अभ्यासानुसार, पालेभाज्या किंवा हिरव्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम केल्याने त्यातील ९७% पोषक घटक नष्ट होतात. म्हणूनच तुम्ही ते मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नये.

कॉफी : बरेच लोक ऑफिसमध्ये किंवा घरात मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करतात. मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करणे ही चांगली कल्पना नाही. पुन्हा गरम केल्यावर त्याची चव कमी होते आणि सुगंधही कमी होतो. एक प्रकारे, कॉफी पुन्हा गरम केल्याने ती खराब होते.

चिकन: मायक्रोवेव्हमध्ये चिकन पुन्हा गरम केल्याने साल्मोनेला दूषित होण्याचा धोका वाढतो. चिकन खाण्यापूर्वी, आपण ते चांगले शिजवावे जेणेकरून त्यातील सर्व जीवाणू नष्ट होतील. मायक्रोवेव्हमध्ये मांसाचे सर्व भाग पूर्णपणे शिजवले जात नाहीत त्यामुळे सॅल्मोनेलासारखे जिवंत जीवाणू जिवंत राहण्याची शक्यता जास्त असते.

## गुरुवचन

थकल्या शरिरानं व उदास मनानं चंदन कसाबसा घरी पोहोचला. वाळवंटी व परिसरात त्याचं छोटसं घर, मूळची गरीबी त्यातच यावर्षी प्रचंड दुष्काळ यामुळे कोणत्याही प्रकारचं पीक नाही भाजीपाला नाही अन्नधान्य नाही. आणि अशातच लग्नाचं नियोजन. थोडी विश्रांती झाल्यावर वडिलांनी चंदनकडे पैशाविषयी चौकशी केली. काहीतरी करू असं सांगून वेळ मारून नेली. ती रात्र चंदनसाठी भयंकर होती. गुरुजींनी पैसे न देता फक्त सल्ला दिला तोही धामधूमीत लग्न करण्याचा. इथं तर साधा मंडप घालायची पंचाईत. राहून राहून ते डाळींबाचं गाठोडं त्याला सतावत होतं अखेर त्याने विचार केला की हे गाठोडं सकाळीच गावाबाहेर लांब कुठेतरी नदीपात्रात फेकून द्यायचं. सकाळचा चहापाणी ऊरकून चंदन आपल्या सहकार्यांची नजर चुकवून गाठोड्यासह घराबाहेर पडला.

गावाबाहेर वेशीजवळ चौकात गर्दी पाहून तो जरा थांबला. तिथल्या जवळच्या एका प्रांताच्या राजाचा सेवक दवंडी देत होता की, या दुष्काळाच्या परिस्थितीतही जो कोणी आमच्या राजाला पिकलेली डाळींब आणून देईल त्याला मागेल ते बक्षीस राजाकडून मिळेल. चंदनला हायसं वाटलं, पण राजाला डाळींबाची एवढी काय गरज पडावी?... विचारांच्या तुफानाला रोखून तो थेट दवंडीवाल्याला सोबत घेऊन राजदरबारात पोहोचला.

तिथला प्रसंग फार बिकट होता राजाची एकुलती एक तरूण कन्या एका भयंकर आजाराने मृत्यूशय्येवर शेवटच्या घटका मोजत होती, राजवैद्यांनी मोठ्या परिश्रमाने वेगवेगळ्या वनस्पतींच्या सहाय्याने एक औषध तयार केलं होतं पण ते डाळींबाच्या रसातून दिलं तरच राजकन्या वाचणार होती. चंदनने डाळींब आणलेली पाहून राजाचे डोळे भरून आले, त्याने चंदनला आपल्या सिंहासनावर बसविले. वैद्यांनी उपचार सुरू केला. तासाभरात राजकन्या हालचाल करू लागली. राजाला अत्यंत आनंद झाला त्यांने चंदनची विचारपूस केली व विचारले तुला काय हवे? चंदनने सर्व परिस्थिती सांगितली व म्हणाला दारात एक मंडप व वऱ्हाडी मंडळीला पोटभर जेवू घाला दुसरं काही नको. राजा म्हणाला, आज तुझ्यामुळे माझं सर्वस्व वाचलं तुझी बहीण माझ्या मुलीप्रमाणे आहे, तिचं लग्न एका राजकन्येप्रमाणेच होणार. असं म्हणून राजाने ताबडतोब चंदनच्या घराच्या जागी भव्य महाल ऊभारला, चंदनला सोनं चांदी पैसा व अमाप संपत्ती बहाल केली शिवाय ठरलेल्या मुहुर्तावर चंदनच्या बहिणीचा शाही विवाह सोहळा संपन्न झाला. वऱ्हाडी चांदीच्या ताटात पक्वान्न खाऊन तृप्त झाले. राजा आपल्या कन्येसह विवाहाला उपस्थित राहिलेला पाहून चंदनला गुरूचं वचन आठवलं.... खरच.... गावात असं लग्न कोणाचच झालं नसेल...

तात्पर्य - गुरूवर विश्वास ठेवा. गुरू वचन त्रिकाल सत्य !!! (पूर्ण)

## जीवन का अमृत (भाग १)



धन्यवाद है, जिन्होंने आपको किसी ऐसे से मिलाया, जिसने आपको पिता-प्रभु के सच्चे घर को जाने वाले रास्ते पर डाल दिया। कृपया प्रेमपूर्वक सत्संग में लगे रहें और दूसरों से प्रेम करें, ताकि आपमें प्रेम भरी प्रतिक्रियाएँ हों और प्रेम की तरंगें उठें, जिनसे आपके ध्यान-अभ्यास में सहायता मिले। सांसारिक लोगों की संगत से बचने की कोशिश करें, क्योंकि उनकी संगत आपकी उन्नति पर असर डालेगी। अपने लक्ष्य को पाने के लिए अच्छे से अच्छा करो। प्रभु उनकी सहायता करता है, जो अपनी सहायता करते हैं। आप अवश्य ही सतुरु की शिक्षाओं के अनुसार

### अहंकार खत्म होगा

जियें । इससे आपमें नम्रता, प्रेम और समर्पण आ जाएँगे। बाकी सब वस्तुएँ पीछे-पीछे जाएँगी और धीरे-धीरे अहंकार खत्म हो जाएगा।

१५१. मुझे पता लगा कि भरसक कोशिशों के बावजूद भी आपको कोई खास आंतरिक अनुभव प्राप्त नहीं हुआ है। अपनी त्रुटि का पता लगाने के लिए कृपया निम्नलिखित की ओर ध्यान दें ।

(१) क्या आप पवित्र नामों का जाप जबान से करते हैं? यदि हाँ, तो इसे धीरे-धीरे मन ही मन के जाप में बदल दें। इसको और अधिक इस प्रकार समझा जा सकता है-मान लो आप कुछ दिन पहले किसी से मिले और उससे बातें की और अब आप उन बातों को याद करना चाहते हो । आप न तो ज़बान का प्रयोग करेंगे, न ही दोबारा बोलेंगे, बल्कि मन ही मन उस सारे वार्तालाप को दोहराएँगे। यह सही प्रकार का जाप या सिमरन है । ध्यान-अभ्यास के समय पाँच पवित्र नामों का जाप मन ही मन करना है। (२) क्या आपको अपने शरीर में चल रही साँसों का आभास रहता है? यदि हां, तो इसे खत्म करें, क्योंकि साँसों की प्रक्रिया नाभि चक्र से शुरु होती है और नासिका चक्र में समाप्त होती है। अतः ध्यान-अभ्यास के समय आप शरीर में ही रहते हैं। आप इसे जीत सकते हैं, अगर आप दो भौंहों के बीच और पीछे के स्थान (शिव-नेत्र) पर प्रेम से, एकाग्र होकर देखें (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

प्रत्येक मनुष्य शरीर नहीं एक आत्मा है। आत्मा एक सूक्ष्म प्रकाश का बिंदू है जो भृकुटी में रहती है और दिमाग के द्वारा सारे शरीर को नियंत्रित करती है।

मनुष्य शरीर में सात ऊर्जा चक्र हैं। जिनके द्वारा आत्मा शरीर के अलग अलग अंगो को शक्ति देती है तथा शरीर से सूचनायें प्राप्त करती है और आवश्यक निर्देश देती है। ये ऊर्जा चक्र रीढ़ की हड्डी में अलग अलग जगहो पर हैं।

मुख्य दो ऊर्जा केन्द्र हैं। एक है मूल आधार जो रीढ़ की हड्डी के सबसे नीचे वाले मनके में है। इस में कुंडलनी शक्ति रहती है। दूसरा शक्ति केन्द्र

### सहस्त्रार चक्र

है सहस्त्रार जो सिर में पतालू में है । सहस्त्रार चक्र एक महान चक्र है।

पृथ्वी के दो ध्रुव हैं, उत्तरी एवम दक्षिणी ध्रुव । ऐसे ही मनुष्य में दो ध्रुव हैं, सहस्त्रार और मूलाधार । सहस्त्रार चक्र को उत्तरी ध्रुव के समान समझा जाता है। पृथ्वी उत्तरी ध्रुव द्वारा सूर्य से शक्तियां प्राप्त करती है। जिस से धरती पर पेड़ पौधे उगते हैं तथा चुम्बकीय बल पैदा होता है। इस बल से मनुष्य व जीव जन्तुओं के शरीर की रक्षा के लिये भोजन की पूर्ति होती है। हमारा सहस्त्रार चक्र सूर्य से जुड़ा है तथा भगवान से भी जुड़ा हुआ है।

सहस्त्रार चक्र द्वारा हम सूर्य तथा भगवान दोनो से शक्ति प्राप्त करते हैं। जिस से आत्मा और शरीर दोनो का काम चलता है। ये चक्र एक प्रकाश का बिंदू है।

परंतु यहां पर स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर तथा भगवान से सम्पर्क करने वाली नस नाड़ीयां मिलती हैं। उन से निकलता हुआ प्रकाश ऐसे लगता है जैसे फूल की पंखुड़ीयां हो, इसी लिये इसे १००० पंखुड़ीयों वाला कमल भी कहते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासू : अगं सूनबाई उठ आता, बघ सूर्य उगवला सुद्धा

सून : तुम्हाला तेवढंच दिसणार. सूर्य माझ्या आधी झोपायला जातो, ते पण बघत जा जरा

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशातील सर्वात वेगवान वंदे भारत रेल्वे कोठून कोठे सुरू झाली?
– दिल्ली ते वाराणसी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

परंतु हे सर्व घटक मध न उकळता घेतल्यासच मिळतात. मध उकळल्याने त्यातील औषधी गुणधर्म कमी होतात. मधामध्ये ग्लुकोज, फ्रुक्टोज व सुक्रोज या नैसर्गिक साखरी असतात.

उपयोग : १) मध आणि आल्याचा रस प्रत्येकी एक-एक चमचा एकत्र करून सकाळ-संध्याकाळ घेतल्यास सर्दी कमी होते, तसेच जाठरअग्नी प्रदीप्त होऊन भूक चांगली लागते.

२) एक चमचा मध, एक चमचा आडुळसा रस व अर्धा चमचा आल्याचा रस एकत्र करून प्यायल्याने खोकला बरा होतो.

मळमळ होऊन जर उलटीची भावना होत असेल, तर थोड्याशा गुळामध्ये मध मिसळून त्याचे धारण करावे. यामुळे उलटीची भावना कमी होते.

४) टॉन्सिल्स फुगल्याने घसा दुखत असेल, तर मध व कोमट पाणी एकत्र करून त्यात

### चांगल्या भुकेसाठी

त्रिफळाचूर्ण मिसळावे व हे पाणी गाळून त्याने गुळण्या कराव्यात. यामुळे टॉन्सिल्सची सूज कमी होते. मधाच्या पोळ्यातून काढलेला ताजा मध हा पुष्टिकारक, किंचित कफकर, गुरू, सारक, स्निग्ध, सप्तधातुवर्धक व स्थूलता निर्माण करणारा असतो. तर एक वर्षापेक्षा जास्त काळ झालेला जुना मध हा लेखनकार्य करणारा असून, रुक्ष गुणधर्माचा व स्थूलता कमी करणारा असतो.

६) एक कप दुधामध्ये एक चमचा मध घालून प्याल्यास शक्ती वाढते.

७) रोज सकाळी किंवा रात्री किंचित गरम पाण्यात एक ग्लास दुधात एक चमचा मध घालून मलावरोध दर होऊन शौचास साफ होते.

८) तोंडामध्ये व्रण निर्माण होऊन त्याचा दाह होत असेल, तर मधयुक्त पाणी किंवा नुसता मध बराच वेळ तोंडात धरून ठेवावा किंवा त्याच्या गुळण्या कराव्यात. यामुळे तोंड येणे, तोंडात व्रण पडणे, दाह, तृष्णाविकार (वारंवार तहान लागणे) हे सर्व तोंडाचे विकार दूर होऊन तोंड स्वच्छ होते.

९) स्थूलत्वावर एक वर्षापेक्षा जास्त काळ झालेला जुना मध रोज सकाळी एक चमचा घेऊन त्यात अर्धे लिंबू पिळून एक ग्लास गरम पाण्यात हे मिश्रण घेतल्यास स्थौल्य कमी होऊन बांधा सुडौल होतो, तसेच आम्लपित्ताचा विकार कमी होऊन शौचास साफ होते. हे मिश्रण हृदयरोगांसाठी सुद्धा उपयुक्त आहे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



सदा विजय (२७० इंजिनिअर रेजिमेंट) परिवारातील भारतीय जवानांच्या बाईक रॅलीने वेधले लक्ष रॅलीच्या आगमनप्रसंगी अहिल्यानगर येथील सदा विजय परिवारातील सर्व माजी सैनिक व माजी सैनिक किरण बाबासाहेब कार्ले (निवृत्त आर्मी, २७० इंजिनिअर रेजिमेंट) यांच्या वतीने रॅलीतील सर्व सहभागी लष्करातील जवानांचे स्वागत करण्यात आला.

## देशप्रेम, एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारी बाईक रॅली : माजी सैनिक किरण कार्ले

### सदा विजय (२७० इंजिनिअर रेजिमेंट) परिवारातील भारतीय जवानांच्या बाईक रॅलीने वेधले लक्ष

नगर – ही बाईक रॅली केवळ एक प्रवास नसून, देशप्रेम, एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा एक प्रेरणादायी उपक्रम आहे. देशासाठी आयुष्याचा महत्त्वाचा काळ अर्पण करणाऱ्या माजी सैनिकांच्या समस्या समाजापर्यंत पोहोचवणे आणि त्या सोडवण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे हे आमचे कर्तव्य आहे. या रॅलीमुळे तरुण पिढीमध्ये देशसेवेची प्रेरणा निर्माण होत असून, शिस्त, त्याग व राष्ट्रप्रेमाचे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे माजी सैनिक किरण कार्ले यांनी स्पष्ट केले.

सदा विजय (२७० इंजिनिअर रेजिमेंट) परिवारातील भारतीय जवानांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली बाईक रॅली पुणे येथून प्रारंभ होऊन विविध शहरांतून मार्गक्रमण करत अहिल्यानगर शहरात दाखल झाली. देशसेवा, माजी सैनिकांचे प्रश्न, सामाजिक ऐक्य आणि देशप्रेमाची भावना जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने काढण्यात आलेल्या या रॅलीचे अहिल्यानगरमध्ये ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

रॅलीच्या आगमनप्रसंगी अहिल्यानगर येथील सदा विजय परिवारातील सर्व माजी सैनिक व माजी सैनिक किरण बाबासाहेब कार्ले (निवृत्त आर्मी, २७० इंजिनिअर रेजिमेंट) यांच्या वतीने रॅलीतील सर्व सहभागी लष्करातील जवानांचा पुष्पहार, पुष्पगुच्छ तसेच सन्मानचिन्ह देऊन स्वागत व गौरव करण्यात आला.

यावेळी त्यांच्या पत्नी प्रतीक्षा किरण कार्ले, मुलगी स्वराली किरण कार्ले, वडील बाबासाहेब नाना कार्ले व आई नंदा बाबासाहेब कार्ले यांची उपस्थिती होती.

या बाईक रॅलीचा मुख्य उद्देश माजी सैनिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेणे, देशासाठी सेवा केलेल्या जवानांप्रती समाजात कृतज्ञतेची भावना निर्माण करणे, तरुण पिढीमध्ये देशप्रेम, शिस्त व सामाजिक बांधिलकी रुजवणे हा होता. तसेच समाजात सकारात्मक संदेश पोहोचवून एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यावरही भर देण्यात आला आहे.

या उपक्रमास अहिल्यानगर शहरातील नागरिक, विविध सामाजिक संघटना तसेच माजी सैनिक यांचा प्रतिसाद लाभला.

# विविध संघटनांमधील कर्मचाऱ्यांचा १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी मोर्चा

### अहिल्यानगरमध्ये कृती समितीची बैठक; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सर्व कामगार संघटनानी संपामध्ये सहभागी व्हावे : अविनाश घुले



देशव्यापी संपात सहभागी होण्यासाठी आयोजित बैठकीत हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांच्यासह रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, सुधीर टोकेकर, युवराज पाटील, विलास पेदराम, पुरुषोत्तम आडे, गोविंद सांगळे, मधुकर केकान, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, महबूब सय्यद, रविंद्र भोसले आदी.

नगर – शहरात कामगार संघटना कृती समितीच्या वतीने देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीस शहर व जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी देशपातळीवरील १० केंद्रीय कामगार संघटना तसेच देशभरातील ५५ फेडरेशन या संपात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. या संपाअंतर्गत अहिल्यानगर येथे १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता नवीन महापालिका कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रोड येथे सर्व कामगार संघटना, त्यांचे पदाधिकारी व कामगार एकत्र येणार असून, त्यानंतर मोर्चाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणार आहेत. तेथे कामगार संघटनांच्या वतीने मागण्यांचे सविस्तर निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले जाणार असल्याचे कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले.

बैठकीत कामगारांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करणे, कंत्राटी, बाह्यस्रोत व दैनिक वेतन पद्धतीतील नोकरभरती बंद करून सरकारी विभाग व सार्वजनिक उपक्रमांमधील सर्व रिक्त पदे नियमितपणे भरणे, पीएफआरडीए कायदा रद्द करून एनपीएस व यूपीएस योजना बंद करणे, सरकारकडे जमा केलेली निधीची रक्कम परत देण्याचे निर्देश देणे तसेच सर्व वर्गणीदारांना ईपीएस–९५ पेन्शन प्रणालीत समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. पेन्शन कायदा २०२५ रद्द करून ओपीएस अंतर्गत पेन्शन हक्क पूर्ववत करावेत, अशीही जोरदार मागणी करण्यात आली.

तसेच केंद्र सरकारने लागू केलेल्या चारही कामगार संहिता रद्द कराव्यात, सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण व कंपनीकरण थांबवावे, सरकारी विभागांतील कर्मचारी कपात तात्काळ बंद करावी, अशी भूमिका मांडण्यात आली. ८ व्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेचा आढावा घेऊन दर पाच वर्षांनी नियतकालिक वेतन सुधारणा कराव्यात व मूळ वेतनाच्या १० टक्के किंवा किमान ५,००० रुपये अंतरिम मदत मंजूर करावी, अशी मागणी करण्यात आली.

कंत्राटी कर्मचाऱ्यांसह सर्व कर्मचारी व पेन्शनधारकांसाठी सर्व रुग्णालयांमध्ये रोखविरहित उपचारांची सुविधा देणारी, सरकारच्या पाठिंब्यासह सर्वसमावेशक आरोग्य विमा योजना लागू करावी. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) रद्द करावे व शिक्षकांसाठी अनिवार्य टीईटीचा आदेश मागे घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. संविधानातील कलम ३१० व ३११ (२) (अ), (ब), (क) रद्द करून केंद्र–राज्य संबंधांची पुनर्व्याख्या करावी व सहकारी संघराज्याचे संरक्षण करावे, अशी भूमिका मांडण्यात आली. तसेच संविधानातील धर्मनिरपेक्षतेचे समर्थन करत सर्व प्रकारच्या जातीयवादाविरुद्ध लढा देण्याचे आवाहन करण्यात आले.

याशिवाय माथाडी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून माथाडी कामगारांना पेन्शन योजना लागू करावी, सरकारी कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हिंसक हल्ल्यांबाबत भादंवि कलम ३५३ जामीनपात्र करावे, शिक्षण विभागात 'पवित्र' पोर्टलमार्फत शिक्षकांची त्वरित भरती करावी, विडी कामगारांना दर हजेरी किमान २५० रुपये देण्यात यावेत, लिपिक वर्गीय संवर्गासह इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर कराव्यात, आधार व गटप्रवर्तक यांना शासकीय सेवेत समाविष्ट करून मानधन वेळेवर द्यावे, तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन वेळेवर मिळावे, अशा एकूण १७ मागण्या निवेदनाद्वारे मांडल्या जाणार आहेत.

या बैठकीस हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांच्यासह रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, सुधीर टोकेकर, युवराज पाटील, विलास पेदराम, पुरुषोत्तम आडे, गोविंद सांगळे, मधुकर केकान, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, महबूब सय्यद, रविंद्र भोसले आदी कामगार नेते उपस्थित होते.

देशव्यापी संप यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कामगारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# श्री छत्रपती अभियांत्रिकीमध्ये १२ फेब्रुवारीला भरती मेळावा

निंबळक – नेप्ती येथील श्री छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये १२ फेब्रुवारी रोजी भरती मेळावा होणार असून या मध्ये यामध्ये जवळपास ४५ इंडस्ट्रीज विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणार आहेत. बोर्ड ऑफ ॲप्रेंतिसेशिप ट्रेनिंग (बोट) आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय नेप्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भरती मेळाव्यामध्ये अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कला, विज्ञान, वाणिज्य, संगणक विज्ञान, औद्योगिक प्रशिक्षण अशा क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागामार्फत या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले गेले असून या भरती मेळाव्यामध्ये अहमदनगर, पुणे, रांजणगाव, सुपा, चाकण यांसारख्या एमआयडीसी मधून विविध कंपनी सहभागी होणार असून यामध्ये व्ही आर डी ई, सुझलॉन एनर्जी, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, एपिटोम कंपोनंट लिमिटेड इत्यादी बहुराष्ट्रीय कंपनीचा देखील सहभागी असणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी दिली असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या रोजगार उपलब्धतेच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा अशी आश्वासन विद्यार्थ्यांना केले आहे.

बोर्ड ऑफ ॲप्रेंतिसेशिप ट्रेनिंग (बोट) (वेस्टर्न रिजन), मुंबईचे उपसंचालक एन.एन. वडोदे हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभणार आहेत. हा रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एस. एम. वाळके तसेच समन्वयक प्रा. ए आर माने, प्रा. ए. एस. कांबळे, प्रा. जी बी साळुंके, प्रा. पी. डी. कोतकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना नाव नोंदवायचे असेल अशा विद्यार्थ्यांनी १२ फेब्रुवारीला सकाळी ९ वा. महाविद्यालयात उपस्थित रहावे.

# फिनिक्सचे नेत्र शिबिर गोर–गरीबांसाठी आधार

### महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; स्व. शिवाजीराव कर्डिले नेत्रालय उभारणीला सहकार्याचे आश्वासन, ६३ शिबीरार्थींवर होणार मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया



फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी उपस्थित महापौर सौ. ज्योती गाडे.

नगर – फिनिक्स फाऊंडेशनचे नेत्र शिबिर गोर–गरीबांसाठी आधार ठरत आहे. लाखो रुग्णांना या शिबिराच्या माध्यमातून नवदृष्टी मिळाली आहे. या निस्वार्थ सेवेचा लाभ ३ लाख ७६ हजार गरजूंना मिळाला आहे. हे शिबिर घेत असताना कायम स्वरुपी सेवेच्या उद्देशाने फिनिक्सच्या माध्यमातून स्व. शिवाजीराव कर्डिले नेत्रालय उभारण्याच्या त्यांच्या संकल्पाला सर्वपरीने सहकार्य करण्याचे आश्वासन महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी महापौर गाडे बोलत होत्या. यावेळी नगरसेविका गीतांजली काळे, आशाताई डागवाले, सुनिता भिंगारदिवे, पौर्णिमा गव्हाळे, नगरसेवक निखील वारे, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, योगीराज गाडे, पै. महेश लोंढे, मोहित पंजाबी, अवधूत फुलसौंदर, ह.भ.प. कोन्हे महाराज, फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, माजी सरपंच राम पानमळकर, सोनू भुजबळ, मयुर पाखरे, संजय शिंदे, अण्णा चौधरी, साहित्यिक सुनिल राऊत आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे महापौर गाडे यांनी फिनिक्सच्या माध्यमातून जालिंदर बोरुडे यांचे कार्य प्रेरणादायी आहे. असे निस्वार्थ सामाजिक कार्यकर्ते निर्माण झाल्यास समाजातील प्रश्न सुटून देशाचा विकास साधला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जालिंदर बोरुडे म्हणाले की, शेतकरी व गरजू घटकातील ज्येष्ठ नागरिकांचे दृष्टीदोष दूर करुन त्यांचे जीवन प्रकाशमान करण्याचे काम फिनिक्स फाऊंडेशन करत आहे. सर्व महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, सण–उत्सव फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमाने साजरे करुन दर महिन्याला या शिबिराचे आयोजन केले जाते. नेत्रदान व अवयवदान चळवळीत देखील फाऊंडेशनचे योगदान सुरु असून, अनेक दृष्टीहीनांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी मिळाली असल्याची माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमात नवनिर्वाचित महापौर गाडे यांच्यासह सर्व उपस्थित नगरसेवकांचा फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला. ती आहे म्हणून!..., या लघुपटाला बक्षीस मिळाल्याबद्दल सुनिल राऊत यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. गीतांजली काळे, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा व ह.भ.प. कोन्हे महाराज यांनी यावेळी या उपक्रमाचे कौतुक करुन या उपक्रमासाठी सहकार्याची भावना व्यक्त केली.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची नेत्रतपासणी केली. या शिबिरात ४१७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ६३ शिबीरार्थींवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात आली. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल राऊत यांनी केले. नेताजी भाबड व राजेंद्र बोरुडे यांनी आभार मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, ओम बोरुडे, जय बोरुडे, जगदीश बोरुडे, सौरभ बोरुडे, विशाल भिंगारदिवे यांनी परिश्रम घेतले.



फकिरवाडा (मुकुंदनगर) येथील यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेच्या वतीने महापौर ज्योती गाडे यांचा सत्कार करताना सचिव प्रा.शशिकांत गाडे व इतर पदाधिकारी.

# अहिल्यानगर शहरातील मनपाच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणार

### महापौर ज्योती गाडे यांचे प्रतिपादन; यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार

नगर – अत्याधुनिक डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देऊन शहरातील मनपाच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर भर देणार आहे. शहरातील अनेक शाळांना क्रिंडागणे नसल्याने त्यांना पर्यायी मैदाने उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी व्यक्त केला.

फकिरवाडा (मुकुंदनगर) येथील यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेच्या वतीने महापौर ज्योती गाडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रा.शशिकांत गाडे, उपाध्यक्ष एम.पी.कचरे, सहसचिव आसाराम म्हस्के, खजिनदार रामचंद्र दिघे आदि यावेळी उपस्थीत होते. यावेळी महापौर गाडे म्हणाल्या की यशवंत विद्यालयाच्या क्रिडांगण विकासासाठी योग्य तो निधी उपलब्ध करून देणार आहे. यावेळी प्रा. गाडे म्हणाले की, ज्योती गाडे यांनी नवनितभाई बार्शिकर यांच्या धर्तीवर शहर विकासाच्या योजना कार्यान्वीत कराव्यात. मिळालेल्या संधीचे सोने करीत इतिहासात नोंद होईल अशी कामे शहरात करण्याचे आवाहन केले. नगरकर नेहमी आठवण काढतील अशी कामे करून गाडे कुटुंबांचे नाव उज्वल करण्याचा सल्ला गाडे यांनी दिला. यावेळी कचरे,म्हस्के, दिघे यांचे भाषणे झाली. शाळेतील मुलींनीही भाषणे करून गाडे यांचे अभिनंदन केले. यावेळी संस्थेच्या वतीने सर्व मुलांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

स्वागत मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी केले. प्रास्तावीक योगेश गुंड यांनी तर मनिषा मगर यांनी सुत्रसंचालन केले.आदिनाथ लवांडे यांनी आभार मानले.

# १८ फेब्रुवारी रोजी पेन्शन अदालतीचे आयोजन

नगर – निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन तसेच इतर आनुषंगिक लाभ देण्यासंबंधी, तसेच निवृत्तीवेतनविषयक अडचणींच्या निराकरणासाठी १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा कोषागार अधिकारी जनार्दन सहारे यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक तसेच संबंधित बँकांचे प्रतिनिधी, निवृत्तीवेतनधारकांच्या संघटनांचे प्रतिनिधी यांनी या अदालतीस उपस्थित राहून आपल्या समस्यांचे/तक्रारींचे निराकरण करून घ्यावे, असेही कळविण्यात आले आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने १३ फेब्रुवारी रोजी 'शेतकरी जनजागृती व क्रेडिट आउटरीच कार्यक्रम'

नगर – सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी शेतकरी जनजागृती व बँकिंग–कृषी योजनांचा क्रेडिट आउटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता श्रीमंत लॉन्स, परखतपूर रोड, तालुका अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथे होणार आहे.

शेतकऱ्यांना बँकिंग सेवांचा अधिकाधिक लाभ मिळावा तसेच विविध कृषी व ग्रामीण विकास योजनांची सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमात कृषी कर्ज, पीक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड (KCC), पशुसंवर्धन, शेळीपालन, कुक्कुटपालन, अन्नप्रक्रिया उद्योग, ग्रामीण आजीविका योजना तसेच नविन कृषी तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

यावेळी बँकेमार्फत उपलब्ध विविध योजना, कर्ज सुविधा, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबाबत तज्ज्ञ अधिकारी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमास सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपयुक्त कार्यशाळा

### पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन; मनरंग कौन्सेलिंग सेंटर व होलिस्टिक ट्रेनिंग सेंटर आयोजित आरोग्य जनजागृती कार्यशाळेस प्रतिसाद



मनरंग कौन्सेलिंग सेंटर व होलिस्टिक ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळेचे उद्घाटन करतना पद्मश्री पोपटराव पवार.

नगर – सद्य परिस्थितीत मानसिक आरोग्य हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. समाजातील प्रत्येक घटकाने याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. आरोग्य जनजागृती कार्यशाळेमुळे तुमचे जीवन अधिक आनंदी बनवण्यास मदत होईल. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतील, असे उद्घाटनप्रसंगी बोलताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले.

समाजामध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. सचिन साळवे संचलित मनरंग कौन्सेलिंग सेंटर व होलिस्टिक ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मोफत मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळा नुकतीच अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एचटीडीसी संस्थेच्या नम्रता कंडोई व सहकारी उपस्थित होते. या कार्यशाळेला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. ज्येष्ठ नागरिक, महिला, पालक, शालेय विद्यार्थी व युवक अशा सर्व वयोगटांतील नागरिकांनी सहभाग नोंदवला.

कार्यशाळे दरम्यान तणाव व्यवस्थापन, भावनिक बुद्धिमत्ता, पालकत्व कौशल्ये, प्रभावी संवाद, नैराश्य व चिंता ओळखणे, तसेच मानसिक आरोग्याची काळजी घेण्याचे मार्ग यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. संवादात्मक सत्रे व विविध उपक्रमांमुळे सहभागी नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.

उद्घाटनप्रसंगी बोलताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, सद्य परिस्थितीत मानसिक आरोग्य हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. समाजातील प्रत्येक घटकाने याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. आरोग्य जनजागृती कार्यशाळेमुळे तुमचे जीवन अधिक आनंदी बनवण्यास मदत होईल. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतील, असे ते म्हणाले.

ही कार्यशाळा डॉ. सचिन साळवे संचलित मनरंग कौन्सेलिंग सेंटर आणि एचडीडीसी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. सहभागी नागरिकांनी कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त केली.

कार्यशाळा यशस्वीतेसाठी श्री. व सौ. संजीव खिस्ती, रितेश सोनीमंडलेचा, प्रसन्ना वाळके, मनीष फिरोदिया, संतोष गोडबोले यांनी परिश्रम घेतले.

भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे डॉ. सचिन साळवे व डॉ. धनश्री साळवे यांच्या वतीने सांगण्यात आले.

# मृतदेहाजवळ कुत्रा बसून राहिला!



हिमाचल प्रदेशातील बर्फाच्छादित पर्वतातून एक हृदय हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. चार दिवस प्रचंड थंडी, बर्फवृष्टी आणि जंगली प्राण्यांचा धोका असूनही एक पाळीव कुत्रा आपल्या मालकाच्या मृतदे–हाजवळून हलला नाही. या काळात त्याने ना काही खाल्लं ना पाणी प्यायला ना आसरा शोधला. 'रेस्क्यू पथक' घटनास्थळी पोहोचल्यावर हा प्रसंग पाहून अनेकांचे डोळे पाणावले. घटना हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील भरमौर परिसरातील आहे.

विकसित राणा (वय १९) आणि त्याचा मावसभाऊ पीयूष (वय १३) हे दोघे प्रसिद्ध भरमाणी माता मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्यांच्यासोबत पीयूषचा पाळीव पिटबुल कुत्राही होता. दर्शनानंतर मंदिराच्या वरच्या भागात व्हिडीओ शूट करण्यासाठी गेले असताना अचानक जोरदार हिमवृष्टी सुरू झाली आणि दोघेही वाट चुकले. त्या दिवशी परिसरात सुमारे पाच फ ूट बर्फ साचला होता. संध्याकाळपर्यंत दोघांनी घरी फोन करून आपण सुरक्षित असल्याचे सांगितले होते; मात्र त्यानंतर संपर्क तुटला. पुढील चार दिवस ते बेपत्ता होते. अखेर 'रेस्क्यू टीम' घटनास्थळी पोहोचली.

डोंगर उतारावर एका झाडाजवळ पीयूषचा मृतदेह आढळून आला. त्याच्या जवळच त्याचा कुत्रा बसलेला होता अत्यंत अशक्त अवस्थेत, गळ्याला किरकोळ जखम झालेली; पण तरीही मालकाला सोडायला तयार नव्हता. 'रेस्क्यू टीम'च्या सुरक्षिततेसाठी कुत्र्याला सौम्य भूल देऊन मृतदेह बाहेर काढण्यात आला. काही अंतरावर एका नाल्यात विकसित राणाचा मृतदेहही सापडला. कुत्र्याला आणि पीयूषचा मृतदेह हेलिकॉप्टरद्वारे भरमौर हेलिपॅडवर आणण्यात आला आणि नंतर कुयिला कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले. या कठीण शोधमोहिमेत स्थानिक प्रशासन, पोलिस, वायुदल, पर्वतारोहक पथके आणि ग्रामस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# कॅलिडोस्कोप

# रेल्वेला शिकवला धडा



भारतात ट्रेनच्या विलंबामुळे सर्वांनाच त्रास होतो; पण या विलंबाला कंटाळून एका विद्यार्थिनीने रेल्वेला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. तिने न्यायालयात खटला दाखल केला आणि मोठ्या दंडाची मागणी केली. शेवटी तिचा विजय झाला.

ही घटना उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात घडली. तिथे एका विद्यार्थिनीची ट्रेनच्या विलंबामुळे 'नीट'ची परीक्षा चुकली. तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. पीडित विद्यार्थिनीने तिच्या वकिलामार्फत रेल्वेला धडा शिकवण्यासाठी दंडाची मागणी केली. वर्षभर चाललेल्या खटल्यानंतर, ग्राहक मंचाने विद्यार्थिनीचे आरोप खरे असल्याचे आढळले आणि रेल्वेला मोठा दंड ठोठावला. कोतवाली पोलिस ठाणे परिसरातील पिकोरा बक्ष परिसरातील रहिवासी समृद्धी ही 'नीट' परीक्षेची तयारी करत होती. तिचे परीक्षा केंद्र लखनऊमधील जयनारायण पीजी कॉलेजला देण्यात आले होते. परीक्षा देण्यासाठी, विद्यार्थिनीने बस्तीहून इंटरसिटी सुपरफास्ट ट्रेनचे तिकीट बुक केले. ट्रेन सकाळी ११ वाजता लखनऊला पोहोचणार होती; परंतु विलंबामुळे ट्रेन नियोजित वेळेपेक्षा अडीच तास उशिरा पोहोचली. विद्यार्थिनी दुपारी १२:३० वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचणार होती. त्यामुळे तिची परीक्षा चुकली.

यामुळे अस्वस्थ झालेल्या विद्यार्थिनीने ग्राहक आयोगाकडे प्रकरण नेले आणि रेल्वेला त्याचे परिणाम भोगावे लागले. जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष, न्यायाधीश अमरजीत वर्मा आणि सदस्य अजय प्रकाश सिंह यांनी रेल्वेला दंड ठोठावला आणि विद्यार्थिनीला नऊ लाख दहा हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने असेही म्हटले आहे, की रेल्वेने भरपाई देण्यास उशीर केला तर त्यांना १२ टक्के रक्कम व्याज म्हणून द्यावी लागेल. समृद्धीचे वकील प्रभाकर मिश्रा यांनी स्पष्ट केले, की ती ७ मे २०१८ रोजी नीट परीक्षा देण्यासाठी लखनऊला गेली होती. तथापि, ट्रेनच्या उशिरामुळे समृद्धीला परीक्षेपासून वंचित राहावे लागले आणि तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. त्यांनी जिल्हा ग्राहक आयोगाकडे खटला दाखल केला. रेल्वे मंत्रालय, रेल्वे महाव्यवस्थापक आणि स्टेशन अधीक्षकांना नोटीस पाठवण्यात आल्या; परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, ११ सप्टेंबर २०१८ रोजी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला.


हा खटला सात वर्षांहून अधिक काळ चालला. आयोगाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले आणि रेल्वेने ट्रेनच्या विलंबाची कबुली दिली, परंतु विलंबाचे कारण स्पष्ट केले नाही. न्यायालयाने दंड ठोठावला आणि रेल्वेला ४५ दिवसांच्या आत नऊ लाख दहा हजार रुपये भरण्याचे निर्दे श दिले.

# हिमालयापेक्षाही जुनी नदी!

भारताची संस्कृती आणि इतिहासात डोकावलं असता अनेकदा काही भारावणारे संदर्भ डोळ्यांसमोर येतात आणि थक्क करून जातात. असेच संदर्भ देशातील नद्यांबाबतही आढळतात. नद्यांच्या उगमाच्या कथा अनेकदा विचार करायला भाग पाडतात, तर काही प्रसंग आख्यायिकांच्या रंजकतेच्या बळावर खिळवून ठेवतात.

ही आहे, भारतातील सर्वात प्राचीन नर्मदा नदी. माघ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या सप्तमीला या नदीचा उगम झाल्याचं म्हटलं जात असून, यंदा हा दिवस २५ जानेवारी रोजी आल्याने या नदीच्या जयंतीचा उत्सव साजरा झाला. मध्य प्रदेशातील अमरकंटक या ठिकाणी उगम पावणारी ही नदी मूळ उगमापासून १३ हजार किलोमीटर दूरपर्यंत वाहत जात तिचा प्रवाह पुढं खंबातच्या खाडीद्वारे सागराशी एकरूप होतो. हिंदूंसाठी नर्मदा ७ पवित्र नद्यांपैकी एक असून, ही भारतातील प्राचीन नदी आहे. इतकंच नव्हे, तर असंही म्हटलं जातं, की नर्मदा ही गंगा नदीपेक्षा ५ पटींनी जुनी आहे.

पुराणांपासून अगदी विज्ञानानंही नर्मदा नदीच्या आयुम ानावर शिक्कामोर्तब केलं आहे. या नदीच्या उगमाबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. या नदीचा उगम भगवान शंकराच्या घामातून झाल्याचं म्हटलं जातं. आणखी एका कथेनुसार भगवान शंकरानं नर्मदा नदीतील प्रत्येक खडकाला शंकराच्या रुपात पुजण्याचं वरदान दिल्यानं या नदीतील प्रत्येक दगड हा शिवलिंगाप्रमाणं पूजनीय ठरतो अशी धारणा आहे. धर्म–शास्त्रांनुसार या नदी ही २५ कोटी वर्षे जुनी असून, हिमालय पर्वत आणि गंगा नदी ३ ते ५ कोटी वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं.



नर्मदा नदीला २५ कोटी वर्षे झाल्याचं सांगण्यामागे आणखी एक तर्क असून, त्यामागचं कारण सांगण्यात येतं, की नर्मदा नदीच्या पाण्यावर मगरींचं राज्य आहे. याच म गरींचं अस्तित्वं पृथ्वीवर २५ कोटी वर्षांपासून आहे. गोड्या पाण्यातील या मगरी जगातील इतर मगरींपेक्षा वेगळ्या असल्याचंही सांगण्यात येतं. काही वैज्ञानिक संदर्भांचा आधार घ्यायचा झाल्यास, नर्मदा नदीच्या खोऱ्याला जगातील काही प्राचीन नदी खोऱ्यांच्या श्रेणीत गणलं जातं. नर्मदा नदीमध्ये डायनासोरची अंडीसुद्धा सापडली असून, त्याशिवाय अनेक जीवांचे अवशेष आणि सापळे इथं सापडल्यानं ही नदी कोट्यवधी वर्षांपासून अस्तित्वात असल्याचं सांगण्यात येतं. या नदीचं आणखी एक महत्त्वं म्हणजे देशातील बहुतांश मुख्य नद्या पश्चिमेपासून पूर्वेला बंगालच्या उपसागराच्या दिशेनं वाहतात; मात्र नर्मदेचा प्रवाह उलट असून, ती पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत वाहते.

# दोन महिने दिवसच!

दिवसानंतर रात्र येते आणि सूर्य मावळला की अंधार पसरतो; मात्र जगात एक असा देश आहे जिथे तब्बल दोन महिने सूर्य मावळतच नाही. ना पूर्ण रात्र होते, ना घनदाट अंधार. मध्यरात्रीही आकाशात सूर्य दिसत राहतो आणि आजूबाजूला मंद उजेड पसरलेला असतो. 'सोशल मीडिया'वर सध्या या अनोख्या देशाची मोठी चर्चा सुरू असून लोक याला निसर्गाचा अद्भुत चमत्कार म्हणत आहेत.

हा अनोखा देश म्हणजे नॉर्वे. नॉर्वेला जगभरात 'मिडनाइट सन' म्हणजेच अर्ध्या रात्रीच्या सूर्यासाठी ओळखले जाते. दरवर्षी काही महिन्यांसाठी नॉर्वेमध्ये जणू वेळच थांबल्यासारखा भास होतो. येथे संध्याकाळ होते; पण पूर्ण अंधार कधीच होत नाही. नॉर्वे आर्क्टिक सर्कलच्या अत्यंत जवळ असण–ारा देश आहे. त्याची भौगोलिक रचना आणि पृथ्वीवरील स्थान यामुळेच तिथे ही अद्भुत नैसर्गिक घटना घडते. दरवर्षी मे ते जुलै या कालावधीत सुमारे ७६ दिवसांपर्यंत नॉर्वेमध्ये सूर्य अस्ताला जात नाही.

सूर्य क्षितिजाजवळ फिरत राहतो; मात्र पूर्णपणे खाली मावळत नाही. त्यामुळे म ध्यरात्रीही आकाशात उजेड कायम राहतो.



या काळात पृथ्वीचे फिरणे अंधाराला नॉर्वे जवळील काही भागांपर्यंत घेऊन येते; मात्र नॉर्वे देशाला संपूर्णपणे अंधारात लपेटू शकत नाही. अंधार जणू या देशाला स्पर्श करून पुढे निघून जातो.

दरम्यान, येथे फक्त हलकीशी संध्याकाळ अनुभवायला मिळते पण पूर्ण रात्र कधीच होत नाही. सोशल मीडियावर नॉर्वेच्या मिडनाइट सनचे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असतात. हे दृश्य पाहून लोक आश्चर्यचकित होतात.

# एकमेव करमुक्त राज्य!

भारतात व्यवसाय करणारे टॅक्स सिस्टीममुळे वैतागले आहेत. फक्त व्यावसायिकच नाही, तर भारतात गरीब श्रीमंत प्रत्येकालाच कर भरावा लागतो. भारतात कर भरणे भरणे प्रत्येकाला कायद्याने बंधनकारक आहे; मात्र देशातीलच एक राज्य पूर्णपणे टॅक्स फ्री आहे. इथे करोडो रुपये कमावले, तरी देखील एक रुपयाचाही कर भरावा लागत नाही.

सिक्कीम हे भारतातील एकमेव 'टॅक्स फ्री' राज्य आहे. सिक्कीला भारतीय प्रजासत्ताकात विशेष दर्जा प्राप्त जाला आहे. यामुळे येथील नागरिकांना करातून १०० टक्के सूट मिळते. इथे लोक कितीही कमावत असले, तरी त्यांना प्राप्तिकर भरावा लागत नाही. भारतीय संविधानाच्या कलम ३७१(एफ) आणि प्राप्तिकर कायदा ११६१ च्या कलम १०(२६एएए) अंतर्गत सिक्कीम राज्यात ही सुविधा लागू करण्यात आली आहे. ११७५ मध्ये सिक्कीमला हा करमुक्त विशेष दर्जा मिळाला. त्या वेळी सिक्कीम हे राज्य भारतीय संघराज्यात सामील झाले नव्हते. सिक्कीमची आर्थिक स्थिती मजबूत करणे आणि तेथील नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणे हा या विशेष अधिकाराचा उद्देश होता. सिक्कीममधील नागरिकांना मिळणारी ही कर सवलत फक्त प्राप्तिकरातून तसेच वैयक्तिक उत्पन्नापुरती मर्यादित नाही, तर ही रोख्यांवर मिळण–ारे व्याज आणि लाभांशावरही लागू होते. सिक्कीम करमुक्त ठेवण्याचा निर्णय राज्याच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरला आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे, तर पर्यटन हादेखील राज्यातील प्रमुख व्यवसाय आहे. सर्व व्यवहार करमुक्त होत असल्याने नागिकांना कमाईची मोठी संधी मिळते. त्यामुळे त्यांची बचत होऊन त्यांना अधिक गुंतवणुक करता येते. या धोरणामुळे राज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. सिक्कीमचे हे करमुक्त मॉडेल देशभरात चर्चेचा विषय बनले आहे. इतर राज्यांनीही अशी धोरणे स्वीकारल्यास भारताची एकूण आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते.



# मेटिंगशिवाय गर्भधारणा

गर्भधारणेसाठी शुक्राणू आणि स्त्रीबीज या दोहोंची गरज असते. मादी मेटिंगशिवाय गर्भार राहू शकत नाही. आयव्हीएफ तंत्रज्ञानातही शुक्राणू आणि स्त्रीबीजाचं कृत्रिम पद्धतीने मीलन घडवून आणलं जातं. पण एका विशिष्ट प्रजातीच्या सापाची मादी मेटिंगशिवाय गरोदर राहू शकते. शास्त्रज्ञांनी उत्तर अमेरिकेतल्या पीट वायपर आणि कनेक्टिकटमध्ये आढळणाऱ्या कॉपरहेड सापांचा बारकाईने अभ्यास करून काही निष्कर्ष काढले आहेत. यानिमित्ताने 'बोआ कॉंस्ट्रिक्टर' प्रजातीच्या सापाच्या मादीतली अलैंगिक प्रजननाची क्षमता जगापुढे आली आहे. नॉर्थ कॅरोलिना स्टेट विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. या सापाच्या बऱ्याच मादी पिलांच्या जन्मात नर सापाचं कोणतंही योगदान नसल्याची बाब त्यांनी हेरली. अलैंगिक प्रजननाला शास्त्रीय भाषेत 'फॅकल्टेटिव्ह पार्थेनोजेनेसिस' असं म्हणतात. या तंत्रज्ञानात म ादीच्या गर्भाशयात शुक्राणूंशिवाय अंडी किंवा गर्भ राहतो.



सापांच्या या प्रजातीत आढळणारा हा गुणधर्म निसर्गाचा चमत्कारच म्हटला पाहिजे. ही अत्यंत दुर्मीळ बाब असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. नर सर्पांमध्ये दोन झेड क्रोमोसोम्स असतात तर मादी सर्पात एक झेड आणि एक डब्ल्यू झेड क्रोमोसोम आढळतो. असं असताना अलैंगिक प्रजननाद्वारे जन्म लेल्या मादी सापांमध्ये डब्ल्यू डब्ल्यू क्रोमोसोम आढळले आहेत. या पद्धतीने जन्मलेला मादी सापांचा रंग आईसारखा असतो. त्यांचे लैंगिक क्रोमोसोम्सही नैसर्गिक प्रजननाद्वारे जन्मलेल्या सापांपेक्षा भिन्न असतात. 'बोआ कॉंस्ट्रिक्टर' ही प्रजाती मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आढळते. इतर सापांच्या तुलनेत त्यांची पचनशक्ती बरीच जास्त असते. या सर्पाची मादी एका वेळी ६० पिलांना जन्म देऊ शकते.


# रणकपूरचं अनोखं जैन मंदिर

भारतात हजारो मंदिरं आहेत. त्यांच्याशी संबंधित अनेक पौराणिक कथा तसंच त्यांची अनेक वैशिष्ट्यंही आहेत. स्थापत्यकला, नक्षीकाम, रचनेमुळे लोकप्रिय ठरलेली मंदिरं पाहण्यासाठी देशी–विदेशी पर्यटकांची गर्दी होत असते. असंच एक संगमरवरी मंदिर राजस्थानातल्या उदयपूरमध्ये वसलंय. जैन धर्मीयांचं श्रद्धास्थान असणारं हे मंदिर १५०० खांबांवर उभं असून उदयपूरपासून १०० किलोमीटरवर असणाऱ्या रणकपूरचं हे एक खास वैशिष्ट्य मानलं जातं. जैनांच्या पाच प्रमुख स्थानांमध्ये याचा समावेश असून इथलं सौंदर्य नजरेत भरण्यासारखं आहे. मंदिराच्या खांबांवर सुंदर नक्षीकाम करण्यात आलं आहे. संगमरवरातून साकारलेल्या या मंदिराच्या दारांच्या रचनेत कलात्मकता ठासून भरली आहे. गाभाऱ्यात तीर्थंकर आदिनाथाच्या संगमरवरात घडवलेल्या चार भव्य मूर्ती आहेत. पंधराव्या शतकात राणा कुंभाच्या राजवटीदरम्यान मंदिर बांधण्यात आलं. मंदिरात बरीच तळघरं आहेत. संकटकाळी मूर्ती लपवता याव्या या हेतूने इथल्या तळघरात त्या लपवण्याची सोय केलेली दिसते. असं हे मंदिर आश्चर्यच म्हटलं पाहिजे.



# वर्ण उजळवणारी आग

सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळे फंडे अनुसरले जातात. या तंत्रज्ञानाच्या युगात सौंदर्य जपण्यासाठी वेगवेगळी तंत्र अवलंबली जातात. शस्त्रक्रिया करून बसकं नाक सरळ केलं जातं. चेहऱ्यावर पडू पाहणाऱ्या सुरकुत्या थोपवण्यासाठी नानाविध थेरपींचा अवलंब होतो. आधुनिक तंत्र आणि उपचारामुळे सावळ्या मुलीही गोऱ्या दिसू लागतात. थोडक्यात काय, आता सौंदर्यक्षेत्रात अशक्य असं काहीही राहिलेलं नाही. फॅशनच्या जगात कधी कुठला ट्रेंड येईल सांगता येत नाही. व्हिएतनाममध्ये 'फायर ट्रिटमेंट' किंवा 'फायर थेरपी'द्वारे सौंदर्य खुलवण्याचा भन्नाट प्रयोग सुरू आहे. आपण आगीपासून चार हात लांबच राहतो. पण हीच आग वर्ण उजळवू शकते यावर आपल्याला विश्वास ठेवावा लागेल. सध्या व्हिएतनाममधल्या पुरूष आणि महिलांना सुंदर दिसण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं आहे. इथली सलून्स आणि स्पा फायर थेरपीद्वारे त्यांना सुंदर बनवण्यास सज्ज आहेत. या उपचारात अंगावर टॉवेल टाकून त्याला आग लावण्यात येते. ३० सेकंद ते एक मिनिटापर्यंत हा प्रकार सुरू राहतो. या प्रकारामुळे सौंदर्यवृद्धी होतेच शिवाय निद्रानाश, डोकेदुखी, अंगदुखी यासारख्या समस्याही दूर होत असल्याचा दावा आहे. या थेरपीदरम्यान योग्य ती काळजी घेतली जाते असं तज्ज्ञ सांगतात. फायर थेरपीमुळे सुरकुत्यांचं प्रमाण कमी होत असल्याचं सांगितलं जातं. चीनमध्येही या तंत्राची चलती आहे. तिथे याला 'फ्लेम फेशियल' असं म्हणतात. ही थेरपी देताना अंगावर टाकल्या जाणाऱ्या टॉवेलवर अल्कोहोल शिंपडतात. प्रशिक्षित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया होत असल्यामुळे काळजीचं कारण नसल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे कधी व्हिएतनामला भेट दिली तर फायर थेरपी तुमच्या बकेट लिस्टमध्ये असू द्या.



# ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’ येथे उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी दिली अचानक भेट

## आरोग्य सेवांविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे दिले आदेश

नगर – महानगरपालिकेचे उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी दातरंगे मळा येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे अचानक भेट देत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी डॉक्टर व कर्मचारी यांच्याशी संवाद साधत ओपीडी, औषध वितरण, तपासणी आणि सुविधा व्यवस्थेची तपासणी केली. यावेळी नगरसेवक महेश लोंढे आणि डॉ. गौरव देशमुख उपस्थित होते.



उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी दातरंगे मळा येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे अचानक भेट देत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. (छाया – लहू दळवी)

उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव म्हणाले, केंद्र, राज्य आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांसाठी विविध मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत, परंतु या सुविधा अनेक नागरिकांना माहित नसतात. त्या जनतेपर्यंत पोहोचाव्यात म्हणून सर्व दवाखान्यांच्या बाहेर आरोग्य सेवांचा तपशील असलेले फलक लावण्याचे आदेश दिले आहेत.

ते पुढे म्हणाले की, दातरंगे मळा येथील ‘आपला दवाखाना’ सध्या दररोज ३० ते ४० ओपीडी रुग्णांची तपासणी करतो. ही संख्या वाढवून दररोज शंभर रुग्णांना सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आरोग्य सेवांविषयी जनजागृती वाढवून नागरिकांनी आपल्या प्राथमिक तपासण्या वेळेत करून घ्याव्यात.

जाधव म्हणाले, अनेक वेळा सर्वसामान्य कुटुंबांतील व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आजारपण अंगावर काढतात, त्यामुळे आजार गंभीर बनतो. महापालिकेच्या दवाखान्यांत मोफत तपासण्या आणि औषधे उपलब्ध आहेत. नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा.

नगरसेवक महेश लोंढे म्हणाले, दवाखान्यात आल्यावर सुरुवातीला असं वाटलं की व्यवस्था विस्कळीत असेल, पण प्रत्यक्ष पाहणी केली असता चांगली शिस्तबद्ध व्यवस्था आणि गुणवत्तापूर्ण सेवा दिली जात असल्याचे दिसले. नागरिकांनी या मोफत आरोग्य सेवांचा अधिकाधिक लाभ घ्यावा.

ते पुढे म्हणाले, प्रभाग क्रमांक ९ मध्ये आरोग्य जनजागृती उपक्रम सुरू करण्यात येईल, जेणेकरून प्रत्येक नागरिकाला या सुविधांची माहिती मिळेल.

डॉ. गौरव देशमुख यांनी सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. येथे नागरिकांना औषधे पूर्णपणे मोफत दिली जातात. येणाऱ्या दिवसांत ओपीडीची क्षमता वाढवून अधिकाधिक नागरिकांना या सेवांचा लाभ देण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत.

महापालिकेच्या माध्यमातून आरोग्य सुविधा मोफत देणे ही जनसेवेची खरी व्याख्या आहे. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेत आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे प्रतिपादन उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव व्यक्त यांनी केले.

# जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासकांच्या नियुक्तीला स्थगिती

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झेडपी मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांचे आदेश

नगर – जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार विस्तार अधिकारी दर्जाच्या प्रशासकांच्या हातात दिला जाणार होता. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनात सर्वच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. मात्र, या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल रिट याचिकेवर सुनावणी होवून प्रशासक नेमण्याच्या आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिल्याने त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी गटविकास अधिकारी यांना पत्रक काढत प्रशासक नेमण्याची कार्यवाही न करण्याचे आदेश काढले आहेत.

नगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे गट आणि गणातील इच्छुक डोळे लावून बसले आहेत. त्यातच, आता ७५७ ग्रामपंचायतींच्याही मुदती संपल्या आहेत. यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे अधिकार हे प्रशासकांकडे दिले जाणार होते. यापूर्वी डिसेंबर २०२५ अखेर मुदत संपलेल्या ११६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबल्याने त्या ठिकाणी अगोदरच प्रशासक नियुक्ती करण्यात आली आहे. आता आणखी ७५७ ग्रामपंचायतींवर प्रशासन नेमले जाणार होते.

या ठिकाणी कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, पाणी पुरवठा उपअभियंता, तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नियुक्त्या देण्यात येणार होत्या. मात्र, प्रशासक नियुक्तीप्रकरणी अरविंद दळवी व इतर यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात रिट याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत कार्यवाही न करण्याच्या सुचना न्यायालयाने दिल्याने त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासानाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही थांबवली आहे.

# रुईछत्तीशीत तरुणाचे अपहरण करून बेदम मारहाण

## १६ हजार रुपयांचा मोबाईल हिसकावला, २ जणांच्या विरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – जुन्या भांडणाची कुरापत काढून एका तरुणाचे दुचाकीवरून अपहरण करून त्याला जीवे मारण्याची धमकी देत बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना रुईछत्तीशी परिसरात घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रविंद्र संतोष शिंदे (वय ३०, रा.रुईछत्तीशी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे जनसेवा हॉटेल येथे नाश्ता करत असताना आरोपी गणेश देवराम छत्तीशे (रा. रुईछत्तीशी, ता.नगर) याने त्यांना बळजबरीने दुचाकीवर बसवून नेले. ’तू सागर जगदाळे सोबत फिरतोस आणि माझ्याविरुद्ध बोलतोस’ असे म्हणत आरोपीने रविंद्र यांचा १६ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून घेतला. गुणवडी तलावात ढकलून देऊन जीवे मारण्याची धमकी दिल्याने रविंद्र यांनी धावत्या दुचाकीवरून उडी मारून स्वतःचा बचाव केला. मात्र, आरोपीने पाठलाग करून त्यांना दगड आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेनंतर फिर्यादीचा चुलत भाऊ गणेश शिंदे आणि मित्र आरोपीच्या घरी मोबाईल मागण्यासाठी गेले असता, आरोपी गणेश छत्तीशे आणि प्रशांत देवराम छत्तीशे यांनी त्यांनाही हातातील कड्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच चाकूचा धाक दाखवून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक भरत धुमाळ पुढील तपास करत आहेत.

# रुईछत्तीशीत हॉटेल कामगारावर जीवघेणा हल्ला

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तीशी परिसरात एका हॉटेल कामगारावर जुन्या वादातून लोखंडी वस्तूने आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. हॉटेल जय मल्हार समोर झालेल्या या हल्ल्यात संबंधित कामगार गंभीर जखमी झाला असून, याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत गंगा अर्जुन सुनार (मूळ रा.नेपाळ, हल्ली रा.रुईछत्तीशी, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे पती येथील एका हॉटेलमध्ये कामाला आहेत. महिनाभरापूर्वी आरोपींनी ’आमच्या हॉटेलवर कामाला आला नाही तर तुला उचलून नेऊ’, अशी धमकी दिली होती. ६ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास फिर्यादीचे पती हॉटेलकडे जात असताना, आरोपी संजय दत्तात्रय नाईक (रा. वाळकी, ता.नगर) आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले.

काही समजण्यापूर्वीच आरोपी संजय नाईक याने लोखंडी वस्तूने त्यांच्या डोक्यात प्रहार केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्याचवेळी त्याच्या इतर दोन साथीदारांनी लाकडी दांडक्याने पाठीवर मारहाण करत शिवीगाळ केली. तसेच पुन्हा दिसल्यास जिवे मारण्याची धमकी देऊन आरोपी पसार झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गंभीर दुखापत केल्या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहेत.

# पारधी विकास आराखड्याची त्वरित पारदर्शक अंमलबजावणी करा; वंचित लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवा अन्यथा उग्र आंदोलन



आदिवासी पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने सुरू केलेल्या पारधी विकास आराखडा योजनेची पारदर्शकपणे अंमलबजावणी करून खऱ्या वंचितांपर्यंत लाभ पोहोचवावा, अशी मागणी आदिवासी शक्ती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

नगर – आदिवासी पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने सुरू केलेल्या पारधी विकास आराखडा योजनेची पारदर्शकपणे अंमलबजावणी करून खऱ्या वंचितांपर्यंत लाभ पोहोचवावा, अशी मागणी आदिवासी शक्ती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

शासनाने पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही योजना सुरू केली असली, तरी राजूर आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कामकाजाची पद्धत आणि यापूर्वीचे अनुभव पाहता अनेकदा वंचित लाभार्थ्यांना वगळून ठराविक लोकांनाच प्राधान्य देण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे उपेक्षित राहिलेल्या पारधी समाजालाच या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव, कोळगाव, येळपणे, भानगाव व बेलवंडी या गावांमध्ये गृहभेटी घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच पारधी विकास आराखड्यांतर्गत कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत, याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी बैठक आयोजित करावी. लाभार्थी निवड प्रक्रिया पारदर्शक ठेवून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी व शासनाच्या इतर आदिवासी कल्याण योजनांचाही लाभ पारधी समाजापर्यंत पोहोचवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र स्वरूपाचे उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी आदिवासी शक्ती संघटनेच्या अध्यक्ष जयश्री काळे यांच्यासह काजल काळे, वृषाली काळे, ऐश्वर्या काळे, योगिता काळे, उज्वला काळे, मयूर काळे, चंचल काळे, दीक्षा भोसले, रेबीन चव्हाण, कृष्णा चव्हाण, शिवानी चव्हाण, सरिता चव्हाण, कैकाई चव्हाण आदींसह वंचित लाभार्थी उपस्थित होते.

# तीन दिवसांत अवैध व्यवसायांवर होणार कारवाई

## पोलिस अधीक्षकांच्या आश्वासनानंतर ग्रामस्थांचे उपोषण मागे

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तिशी येथे सुरू असलेले कला केंद्र, डान्सबार व वेश्या व्यवसाय त्वरित बंद करण्यात यावेत, या मागणीसाठी ग्रामस्थांनी गावात सुरू केलेले उपोषण अखेर जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आश्वासनानंतर १० फेब्रुवारी रोजी मागे घेण्यात आले. तीन दिवसांच्या आत संबंधित अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे अश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण सोडले.



रुईछत्तिशी येथील ग्रामस्थांचे उपोषण सोडवताना जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे.

गेल्या दोन दिवसांपासून रुईछत्तिशी परिसरात सुरू असलेल्या वेश्या व्यवसाय, डान्सबार व कला केंद्रांमुळे गावातील सामाजिक वातावरण पूर्णतः दूषित झाले असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी उपोषणास सुरुवात केली होती. या भागात मोठी बाजारपेठ आहे. मात्र, अवैध व्यवसायांचा थेट परिणाम स्थानिक व्यापारावर होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले, तसेच गावात अनेक शैक्षणिक संस्था असून, बाहेरगावाहून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र, या व्यवसायांमुळे पालक मुलांना शाळेत पाठविण्यास टाळाटाळ करत आहेत. हे अवैध व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासून खुलेआम सुरू आहेत. कारवाई झाली तरी ते पुन्हा सुरू होतात. यामुळे नागरिक अक्षरशः कंटाळून गेले होते. अखेर संतप्त ग्रामस्थांनी उपोषणाचा पवित्रा घेतला. मागण्या मान्य न झाल्यास रास्ता रोको आंदोलन, तसेच आत्मदहनाचाही इशारा दिला होता.

दरम्यान, १० फेब्रुवारी रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेत मागण्या समजावून घेतल्या. तीन दिवसांच्या आत संबंधित कला केंद्र, डान्सबार व वेश्या व्यवसायावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले.

# बसस्थानक परिसरात अश्लील हावभाव करणाऱ्या ११ महिलांवर कोतवाली पोलिसांनी केली कारवाई

नगर – शहरातील माळीवाडा बस स्थानक परिसरात रस्त्याचे कडेला उभे राहुन रस्त्याने येणारे जाणारे लोकांकडे पाहुन अश्लील हावभाव करुन व अश्लील गाणे म्हणत वातावरण दुषित करणाऱ्या ११ महिलांवर कोतवाली पोलिसांच्या पथकाने कारवाई केली आहे. शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

माळीवाडा बस स्थानक परिसरात काही महिला या रस्त्याचे कडेला उभे राहुन रस्त्याने येणारे जाणारे लोकांकडे पाहुन अश्लील हावभाव करुन व अश्लील गाणे म्हणत असल्याची माहिती मिळाल्याने उपअधीक्षक टिपरसे यांनी कोतवालीचे पो.नि. संभाजी गायकवाड यांना कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार पो.नि.गायकवाड यांनी पोलिस पथकाला कारवाईसाठी पाठविले. या पथकाने माळीवाडा बस स्थानक परिसरात जावुन तेथे उभ्या असलेल्या ११ महिला यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणले. त्यांचे विरुध्द महिला पो.हे.कॉ. रोहिणी दंरदले यांच्या फिर्यादी वरून बी एन एस कलम २७१,२९२,२९६ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ११०/११७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पो.नि.संभाजी गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली महिला स.पो.नि. तेजश्री थोरात, उपनिरीक्षक शितल मुगडे, उपनिरीक्षक प्रविण पाटील, पोलिस अंमलदार संतोष बनकर, विशाल दळवी, विनोद बोरगे, रोहिणी दरंदले, विजय ठोंबरे, पल्लवी रोहेकले, वर्षा पंडित, दिखखत, अभय कदम, दिपक रोहकले, दत्तात्रय कोतकर, सुरज कदम, सत्यम शिंदे, रमेश शिंदे, सोमनाथ राऊत यांचे पथकाने केली आहे.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणारी टोळी १८ महिन्याकरीता जिल्ह्यातून हद्दपार; पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांचे आदेश

नगर – राहाता तालुक्यातील ममदापुर येथील गोवंशीय जनावरांची कत्तल करणारी टोळी १८ महिन्याकरीता जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आली आहे. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

यामध्ये टोळी प्रमुख फैजान जब्बार कुरेशी (शेख) (वय २५), टोळी सदस्य मुन्तजीर मुनिर कुरेशी (वय २३), अब्दुलकरीम अमिर कुरेशी (वय ५२), मुनिर अमिर कुरेशी (वय ५६), जब्बार हसन कुरेशी (शेख) (वय २३), नाजीम आयुब कुरेशी (वय ३३), वसीम आयुब कुरेशी (वय २७), रिजवान महेबुब कुरेशी (वय २५, सर्व रा. वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला, ममदापुर,ता.राहाता) यांचा समावेश आहे. या सर्वांनी एक गुन्हेगारी टोळी तयार करुन त्यांचे टोळीचे गुन्हेगारी अस्तित्व टिकविण्यासाठी राहाता तालुक्यातील ममदापुर व लोणी परिसरात सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशत निरतंर राहण्याकरीता गैर कायदयाची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतुक करणे, प्राण्यांना क्रुरतेने वागविणे, गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांसची वाहतुक करणे व इतरांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणणे असे गुन्हे सराईतपणे केलेले असुन दिवसेंदिवस टोळीची गुंडगिरी व गुन्हेगारीवृत्ती वाढतच चालली होती.

टोळीतील टोळी प्रमुख व सदस्यांनी सन २०२१ ते २०२५ मध्ये सराईतपणे गुन्हे केले असुन त्यांचे विरुध्द प्रतिबंध कारवाई करुन सुध्दा त्यांच्या वर्तनात सुधारणा झालेली नाही. टोळीच्या सदर कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे टोळीने केलेल्या गुन्हयांबाबत कोणीही सर्वसामान्य नागरीक उघडपणे तक्रार, साक्ष अगर माहिती देण्यास पोलीस स्टेशनला येत नव्हते. सदर टोळीकडून भविष्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे घडणार असल्याने संपुर्ण टोळीची पांगापांग करुन हद्दपार केल्याशिवाय टोळीचे गैरकृत्यांना आळा बसणार नव्हता तसेच लोणी पोलीस स्टेशन हद्दीत व आजुबाजुच्या परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या जिवीताच्या सुरक्षिततेसाठी व टोळीची दहशत कमी करण्यासाठी व त्यांचे गैरकृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी टोळीप्रमुख व टोळी सदस्य यांचे विरुध्द सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ नुसार अहिल्यानगर जिल्हा हद्दीतुन दोन वर्षाकरीता हद्दपार करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांनी चौकशी करुन शिफारशीसह चौकशी अहवाल सादर केला.

सदर प्रस्तावाची सखोल चौकशी करुन पोलिस अधिक्षक घार्गे यांनी या टोळीला अहिल्यानगर जिल्हयातुन १८ महिन्यांकरीता हद्दपार केले बाबतचे आदेश पारीत केलेले आहेत. अहिल्यानगर जिल्हयात संघटीतपणे गुन्हे करणा–या टोळीचा बिमोड करण्यासाठी जिल्हयातील शरीराविरुध्दचे, मालाविरुध्दचे, गोवंशीय कायदयान्वये गुन्हे करणारे, भारतीय हत्यार कायदयान्वये तसेच वाळु चोरीचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार इसमांच्या टोळीची माहिती संकलीत करुन त्यांचे विरुध्द हद्दपारीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच यापुढेही अशा प्रकारच्या गुन्हेगार टोळीची माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असुन त्यांचे विरुध्दही हद्दपारीची कार्यवाही करणार असल्याचे पोलिस अधिक्षक घार्गे यांनी म्हंटले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक **नितीन कान्होबा घोडके, रा. घर नं. १०, गुरुकृपा निवास, ठुबे मळा, अथर्वनगर, केडगांव, अहिल्यानगर** यांच्या मालकीची आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाबरोबर सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार ठरलेला असून, विद्यमान मालक यांनी विसारादाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालक यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ता. ११/०२/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील खालील वर्णनाची मिळकत–

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २११/३ | १९ | १५०.०० चौ.मीटर |

**ही संपूर्ण प्लॉट मिळकत. यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस :– ६.०० मीटर रुंदीचा रस्ता,
दक्षिणेस :– प्लॉट नं.२०,
पश्चिमेस :– प्लॉट नं.१३,
उत्तरेस :– प्लॉट नं.१८

**अ‍ॅड.सुचिता वाय.कुलकर्णी**
पत्ता :– पारिजात कॉर्नर, तांबटकर मळा, गुलमोहररोड, सावेडी, अहमदनगर–४१४००३, मो : ९८९०६५४३००



श्री.सिध्देश प्रमोद मेहेर
ॲडव्होकेट
ने.ता.८/९/२०२५

४,गोवर्धन अपार्टमेंट
स्टेशन रोड,अहमदनगर
नि.नं.८

## जाहीर नोटीस

अहमदनगर येथील मे. ४ थे सिव्हील जज्ञ साहेब,
सि.डी (पैठणकर साहेब)
यांचे कोर्टात..... दि. चौ. अर्ज नं. २०९/२०२५

**अर्जदार : श्री. अनिरुद्ध अजित घैसास वगैरे**
**सामनेवाला : कोणीही नाही**

ज्या अर्थी प्रस्तुतचे अर्जदार १) श्री. अनिरुद्ध अजित घैसास, २) सौ. प्राजक्ता शाश्वत गोखले यांनी प्रवीण अजित घैसास यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. प्रवीण अजित घैसास यांचे दिनांक १९/०५/२०२३ रोजी अहमदनगर येथे निधन झाले आहे. सदर प्रवीण अजित घैसास यांचे वारस या नात्याने वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत अगर त्यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच मयताचे नावावरील त्यांचे कार्यालयाकडून मिळणारे इतर फायदे मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क व अधिकार नाही असे कोणाचेही म्हणणे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १ महिन्याचे आत म्हणजेच अर्जाची पुढील नेमलेली तारीख २३/०३/२०२६ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या नोटीसीवरुन असेही कळविण्यात येते की, वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर अर्जदाराचा पुरावा घेऊन अर्जदारांना वारस प्रमाणपत्र दिले जाईल व मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे. ता.८/८/२०२५.

तयार करणार
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय व स्तर अ.नगर

शिक्का

हुकूमावरुन
सहअधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर अ.नगर



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. जाफरभाई मुन्शी शेख, २. आस्मा जाफरभाई शेख,** दोघेही रा. आयेशा मस्जिद जवळ, प्लॉट नं. ई – ३१, शाह कॉलनी, यशवंत नगर, गोविंदपुरा, अ.नगर यांचे मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर झालेला असून लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालू वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. दि. ११/०२/२०२६.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :– जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील मौजे **सावेडी** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| १०४/अ१ | १४३/२ | ६७.६७ |

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील आर.सी.सी.मधील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४७.६४ चौ.मीटर व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४२.६९ चौ.मीटर असून ही संपूर्ण बांधकामासह मिळकत. **यांसी चतुःसिमा**–

पुर्वेस – ६.०० मीटर रुंदीचा रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट नं. १४३/१
पश्चिमेस – प्लॉट नं. १४२,
उत्तरेस – प्लॉट नं. १४३/३
येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक काही एक राखुन न ठेविता.

**ॲड. मुबीना एम. जहागीरदार**
नोटरी पब्लिक (भारत सरकार) सैदु कारंजा मस्जिद, झेंडीगेट, अहमदनगर मो.नं. ८७९३४४१९८९

दि. ११/०२/२०२६.
अहमदनगर


# ‘भारत सरकार सिपेट’ छत्रपती संभाजीनगरमध्ये रोजगारक्षम अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर – भारत सरकारच्या रसायन व खत मंत्रालयाच्या अधिपत्याखालील केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था (सिपेट) येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी विविध पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमांसाठी २८ मे २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत असून, यासाठीची अखिल भारतीय सामायिक प्रवेश परीक्षा ७ जून २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

सिपेट ही संस्था देशातील व राज्यातील प्लास्टिक उद्योगांना तांत्रिक साहाय्य, कुशल मनुष्यबळ निर्मिती व संशोधन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देते. संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यामध्ये डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग अँड टेस्टिंग व पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विशेष म्हणजे दहावी, बारावी किंवा विज्ञान शाखेतील पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा देणारे विद्यार्थीही निकालाची वाट न पाहता या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. या तांत्रिक व रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन सिपेटचे प्रशिक्षण प्रमुख आर. जीवन राम यांनी केले आहे.

प्रवेशाबाबत माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ९३७३६८७९१५ किंवा ०२४०–२४७८३२२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

